cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२५ | सोमवार दि.६ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### निवडणूक आयोगाची अंतिम बेरीज वादात!

राज्यात लोकसभेसाठी पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात झालेल्या मतदानाची आकडेवारी त्या त्या दिवशी सायंकाळी आणि अंतिम त्यानंतर अनुक्रमे अकरा आणि चार दिवस उशिरा जाहीर करताना मोठी तफावत दिसली आहे. पहिल्या टप्प्यात ६०.२२ टक्केवरून ६३.७१ टक्के तर दुसऱ्या टप्प्यात ५९.६३ वरून ६२.७१ टक्के सरासरी वाढ दिसत असली तरी चंद्रपूर, यवतमाळसह सत्ताधाऱ्यांना अडचणीच्या मतदार संघात पावणे सहा ते साडे सात टक्के मतदान वाढलेले दिसल्याने

### सीआयएससीई बोर्डाच्या दहावी आणि बारावी परिक्षेचा निकाल आज

मुंबईः कौन्सिल फॉर इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन्स अर्थात सीआयएससीई यत्ता १० वी आणि १२ वी बोर्ड परीक्षा निकाल च्या ६ मे रोजी जाहीर करेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. १० वी आणि १२ वी ची घोषणा ६ मे रोजी सकाळी ११ वाजता केली जाईल,'' असे बोर्डाचे मुख्य कार्यकारी आणि सचिव जोसेफ इमॅन्युएल यांनी सांगितले. निकाल बोर्डाच्या वेबसाइटवर, करियर्स पोर्टल आणि डिजीलॉकरवर उपलब्ध असेल. दहावी आणि बारावीच्या कंपार्टमेंट परीक्षा या सत्रापासून बंद करण्याचा निर्णयही बोर्डाने घेतला आहे. ''ज्या उमेदवारांना परीक्षेच्या त्याच वर्षी त्यांचे गुण किंवा ग्रेड सुधारायचे आहेत ते जास्तीत जास्त दोन विषयांमध्ये सुधारणा परीक्षा देऊ शकतात,'' इमॅन्युएल पुढे म्हणाले. तर सुधारणा परीक्षा जुलैमध्ये घेतल्या जातील, असे ते म्हणाले.

# २०२६ असणार 'महिला शेतकरी आंतरराष्ट्रीय वर्ष'

## संयुक्त राष्ट्राने केली घोषणा, महिला शेतकऱ्यांचा सन्मान वाढला

पुणे । प्रतिनिधी

संयुक्त राष्ट्राने २०२६ 'महिला शेतकरी आंतरराष्ट्रीय वर्ष' म्हणून घोषित केले आहे. कृषी क्षेत्रात महिलांच्या महत्त्वाच्या भूमिकेसाठी महिला शेतकरी आंतरराष्ट्रीय वर्ष'साजरे करत असताना त्यांच्यासमोरील आव्हाने, मालमत्तेमध्ये हक्क ते बाजारपेठेपर्यंत पोहचण्यासाठी जागरुकता निर्माण करणे यासाठी मोठे काम उभारले जाऊ शकते. युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चर च्या नेतृत्वाखाली आणि १०० हून अधिक सह–प्रायोजकांनी या ठरावाला मान्यता दिली. हा ठराव जगभरातील कृषी क्षेत्रात महिलांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेला जागतिक मान्यता अधोरेखित करतो. यामुळे महिला शेतकऱ्यांचा सन्मान वाढला आहे.



जागतिक अन्न उत्पादनात महिला मध्यवर्ती भूमिका बजावतात, जगभरातील अन्न उत्पादनांपैकी निम्म्यामध्ये त्या योगदान देतात. उल्लेखनीय म्हणजे, अनेक देशांमध्ये ते ६० ते ८० टक्के अन्न पुरवठ्यात त्या महत्वपूर्ण कामगिरी बजावतात. त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असूनही, जगभरातील महिलांना पुरुषांच्या तुलनेत जास्त प्रमाणात अन्न असुरक्षितता अनुभवावी लागते. या ठरावाचा मुख्य उद्देश म्हणजे जगभरातील अन्न आणि कृषी उत्पादनात महिलांच्या महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकणे, कृषी क्षेत्रात महिलांना ◀◀ पान २ वर

### कृषी क्षेत्रात सहभाग असूनही महिलांवर अन्याय

एका जागतीक अहवालानुसार, जागतिक कृषी कामगार गटात ३९% महिलांचा सहभाग असूनही, महिलांना भेदभावाचा सामना करावा लागतो. त्यांना मर्यादित जमीन आणि पशुधन मालकी, दर्जेदार रोजगार संधींपर्यंत मर्यादित प्रवेश यासारख्या अडथळ्यांचा सामना करावा लागतो. तसेच असमान वेतन, आणि निर्णय प्रक्रियेत सामावून न घेणे यासारख्या समस्या सगळीकडेच दिसतात.

### कंटेनरच्या धडकेत एकाचा मृत्यू

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे विवाह कार्यासाठी निघालेल्या इसमाचा कंटेनरच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी परळी ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार परळी तालुक्यातील गंगाधर रघुनाथ पोपळे हे आपल्या खोडवा सावरगांव येथुन चंदणवाडी येथे लग्नासाठी जात असताना धर्मापुरी बस स्टॅन्ड जवळ उभे असताना अचानक आलेल्या कंटेनरच्या चालकाने कन्टेनर निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवुन गंगाधर पोपळे यांना जोराची धडक दिली.या घटनेत पोपळे हे गंभीर जखमी झाले व उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी मयताचा मुलगा गणेश गंगाधर पोपळे यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरंन १२६/२०२४ कलम २७९,३०४अ भादवीनुसार कंटेनरचा चालक यांच्या विरोधात गुन्हा दाखल दाखल झाला असून पुढील ठाण्याचे कर्मचारी वाले हे करत आहेत.

## प्रकाश आंबेडकरांनी वंचितचे अशोक हिंगेसाठी जोर लावला

# धसांच्या आष्टीत बजरंगाला पावर मिळणार की विरोधकांना ढिलाई!

## पवार येण्याची शक्यता कमी : सभा मात्र होण्याचे संकेत,रोहीत पवार येणार?





विशेष प्रतिनिधी । बीड

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली असून ॲड प्रकाश आंबेडकर यांनी आंबाजोगाईत सभा घेऊन वंचितचे उमेदवार अशोक हिंगे यांच्यासाठी जोर लावला तर पंकजाताई मुंडे यांच्यासाठी जिल्ह्यातील मराठा नेते कामाला लागले आहेत. त्यातच बजरंग सोनवणे यांच्यासाठी माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांची दि. ६ मे रोजी सकाळी ११ वा. ईदगाह मैदान, आष्टी येथे जाहीर सभा होणार आहे. त्यामुळे यासभेकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. पवार या सभेत काय बोलतात?, पंकजाताई मुंडे यांच्याविषयी काय भुमिका घेतात?, धनंजय मुंडे यांच्यावर कसा हल्लाबोल करतात? याकडे संपुर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. आ.सुरेश धस यांचा बालेकिल्ला असलेल्या आष्टीतील सभेतून शरद पवार हे बजरंगाला पावर देतात की त्यांच्या विरोधी उमेदवाराला ढिलाई देतात, हे पाहणे औत्सुक्याचे आहे. मात्र प्रकृती अस्वस्थामुळे शरद पवार सभेला येण्याची शक्यता तशी कमीच आहे.

बीड लोकसभेची निवडणुक महायुती आणि महाविकास आघाडी अशी सरळसरळ होईल असे वाटत असताना प्रकाश आंबेडकर यांनी निवडणुकीत चुरस निर्माण केली. मराठा आंदोलनात सक्रीय असलेले व मराठा चेहरा म्हणून ज्यांची ओळख असणाऱ्या अशोक हिंगे यांना उमेदवारी देऊन ही लढत तिरंगी झाली आहे. बजरंग सोनवणे यांच्या पाठीशी जिल्ह्यातील मराठा समाज आहे तर पंकजाताई मुंडे यांच्या सोबत ओबीसी, मुस्लिम, मागासवर्गीय समाज आहे. नेते कमी असले तरी सोनवणे यांनी







वातावरण निर्माण केले आहे. दुसरीकडे जिल्ह्याची शान व विकासाच्या दृष्टीने महत्वाचे नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांच्यासाठी ओबीसी नेत्यांसह जिल्हयातील मराठा समाजातील नेते कामाला लागले आहेत. तर दि.७ मे रोजी अंबाजोगाईत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यानंतर बीडमध्ये नितीन गडकरी पंकजाताई साठी संभा घेणार आहेत. प्रकाश आंबेडकर यांची दोन दिवसापुर्वी झालेली सभा लक्षवेधी ठरली. बीडसह कडा येथे आंबेडकर सभा घेणार आहेत. त्यामुळे अशोक हिंगे यांच्यासाठी आंबेडकर यांनी जोर लावला असल्याचे दिसत असून मराठा ◀◀ पान २ वर

### मॅनेज उमेदवार..यावर काय बोलतील, याकडे लक्ष

बजरंग सोनवणे यांना उमेदवारी मिळाल्यानंतर विरोधकांनी त्यांना मॅनेज उमेदवार म्हणून टार्गेट केले. त्यावर सोनवणे यांना छत्रपतींची शपथही घ्यावी लागली. त्यानंतरही कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी हल्लाबोल चढवला. त्यामुळे आता मॅनेज या विषयावर शरद पवार नेमकं काय बोलतात? विरोधकांचा याच मुद्दयावर कसा समाचार घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जरांगे पाटील आज हाजीपूर येथील सप्ताहाला भेट देणार

शिरूर । प्रतिनिधी

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना हाजीपुर ग्रामस्थांच्या वतीने सप्ताहाचे निमंत्रण देण्यात आले असून, या निमंत्रणाचा स्वीकार करून मनोज जरांगे पाटील हे आज सकाळी ११ वाजता हाजीपुरच्या अखंड हरिनाम सदिच्छा भेट देणार आहेत. या कार्यक्रमासाठी श्री. क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. पाटलांच्या व महंत शिवाजी महाराज यांच्या स्वागतासाठी हाजीपुर ग्रामस्थांच्यावतीने जोरदार तयारी करण्यात आली आहे.



शिरूर कासार तालुक्यातील मौजे हाजीपुर येथे श्रीक्षेत्र नारायण गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व हभप. शिवाजी महाराज मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ◀◀ पान २ वर

### मतदारांना जबरदस्तीने पैशाचे वाटप

रत्नागिरी : उमेवारांकडून आरोप प्रत्यारोपाच्या फैरीत झडत आहेत. त्यातच, रत्नागिरी–सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघामध्ये प्रचार अंतिम टप्प्यामध्ये सुरु असून राजापूर विधानसभा मतदार संघामध्ये जोरदार पैशाचे वाटप करीत असल्याचे निदर्शनास येताच आमदार डॉ.राजन साळवी यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना निवेदन सदर करत तक्रार दाखल केली आहे.

# केजमध्ये अवतरला पुष्पा; दोन कोटीचे चंदन पकडले

## सोनवणेंचा कार्यकर्ता असल्याची चर्चा; पोलिसांची संयुक्त कारवाई







बीड । पतिनिधी

दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जूनचा पुष्पा हा सिनेमा चांगलाच गाजला होता. त्यातच केजमध्ये चित्रपटाप्रमाणे पुष्पा अवतरला असून त्याच्याकडून तब्बल दोन कोटीचे चंदन पोलिसांनी जप्त केल्याची फिल्मस्टाईल कारवाई दि. ५ मे रोजी पहाटे केली. केजचा हा पुष्पा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचा कार्यकर्ता असल्याचे सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत चंदनाने भरलेला एक टेम्पो केजहून धारुरकडे जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार केज पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरित्या ही कारवाई केली. केज–धारुर रस्त्यावर नेहरकर पेट्रोल पंपासमोर एक टेम्पो (क्र.२४, ९३८३) पथकाला दिसून आला. यावेळी पथकाने वाहनाच्या चालकाची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव प्रियतम काशिनाथ साखरे (वय ३४, रा. गुरुवारपेठ, अंबाजोगाई) व सोबतचा इसम शंकर पंढरी राख, ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.४ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :१३.०० क्विंटल | २,२५० | २,३५० | २,३०२ |
| ज्वारी/हायब्रिड : ९०.०० क्विंटल | १,६७० | ३,३८१ | २,५४३ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : २४.५० क्विंटल | ७,७१० | १०,६५१ | ९,८५१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ३६.५० क्विंटल | २,३८१ | २,६५२ | २,५८२ |
| चिंच/लोकल: ४.०० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| सोयाबीन: ११४.०० क्विंटल | ४,४७५ | ४,५५० | ४,५०६ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,६०० | ५,६०० | ५,६०० |

## निवडणूक जाहिरातीद्वारे भाजपा–शिंदे–पवार गटाने पुन्हा दाखवून दिली बौध्दीक दिवाळखोरी

### चुकिची जाहिरात देणाऱ्यांवर कारवाई करण्याची कॉँग्रेसची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

पहिल्या दोन टप्प्यात झालेले मतदान आपल्या विरोधात झाले आहे, याची जाणिव झाल्याने भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आता धार्मिक अजेंडा आणि पाकिस्तानला निवडणूक प्रचारात घेऊन आले आहेत. भाजपाने मराठी वर्तमानपत्रात दिलेली जाहिरात त्यांच्या ध्रुवीकरणाच्या अजेंड्याचे प्रतिक आहे. निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेऊन ◀◀ पान २ वर

# सात राज्यांमध्ये तीन दिवस उष्णतेची लाट

## महाराष्ट्राचाही समावेश

नवी दिल्ली। वृतसंस्था

हवामान खात्याने देशातील ७ राज्यांमध्ये पुढील ३ दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. यामध्ये महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, ओडिशा, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा यांचा समावेश आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानच्या काही भागात दोन दिवसांनंतर उष्णतेच्या लाटेचा प्रभाव दिसून येईल. अशी शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. हवामान खात्यानुसार, मराठवाडा आणि विदर्भात तापमानाचा पारा जास्त असेल.

सोमवार, ६ मे छत्तीसगडसह तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रात उष्णतेची लाट कायम राहणार आहे. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळमध्ये दमट उष्णता असेल. मध्य प्रदेश, छत्तीसगड, बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशात जोरदार वारे वाहतील. मंगळवार, ७ मे राजस्थानसह मध्य प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रात उष्णतेची लाट कायम राहणार आहे. ओडिशा, पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेशमध्ये ताशी ६५ किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळमध्ये दमट उन्हाळा सुरू राहील. बुधवार, ८ मे गुजरातसह राजस्थान, मध्य प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्राबरोबरच उष्णतेची लाट राहील. तामिळनाडू, पुडुचेरी आणि केरळच्या काही भागात मुसळधार पाऊस पडू शकतो. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशमध्ये विजेचा इशारा देण्यात आला आहे.



cmyk

## अग्रलेख

# निवडणूक आयोगाची अंतिम बेरीज वादात!

राज्यात लोकसभेसाठी पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात झालेल्या मतदानाची आकडेवारी त्या त्या दिवशी सायंकाळी आणि अंतिम त्यानंतर अनुक्रमे अकरा आणि चार दिवस उशिरा जाहीर करताना मोठी तफावत दिसली आहे. पहिल्या टप्प्यात ६०.२२ टक्केवरून ६३.७१ टक्के तर दुसऱ्या टप्प्यात ५९.६३ वरून ६२.७१ टक्के सरासरी वाढ दिसत असली तरी चंद्रपूर, यवतमाळसह सत्ताधाऱ्यांना अडचणीच्या मतदार संघात पावणे सहा ते साडे सात टक्के मतदान वाढलेले दिसल्याने ही घोषणा वादात सापडली आहे. त्यात मतदार संख्याही जाहीर न केल्याने संशयात अधिकच भर पडली.

सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम बाबत निवडणूक आयोगाच्या बाजूचा निकाल दिला असला तरी सुद्धा विरोधक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करायला मागेपुढे पाहत नाहीत. राज्यातील शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांच्या फुटीबाबत आयोगाने घेतलेल्या भूमिकेला तर खलनायकाची भूमिका ठरवण्याचे काम मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. निवडणूक आयुक्तांनी सुद्धा आपल्यावरील आक्षेप उर्दू शायराच्या शैलित धुडकावून लावत आपल्या प्रशासकीय पोलादी चौकटीला विनाकारण वाकवण्याचा प्रयत्न केला आहे. या सगळ्या प्रकाराची लोकांमध्ये मात्र खूपच वाईट प्रतिमा बनत असते. १९५२ सालापासून निवडणुकीचा अनुभव असणाऱ्या आयोगाला या निवडणुकीत त्यातही गतिमान संगणकीय युगात मतदान झाल्यानंतर तासाभरात निश्चित आकडेवारी जाहीर करणे अवघड राहिलेले नाही. तरीसुद्धा मतदानानंतर जाहीर झालेली आकडेवारी आणि आयोगाने जाहीर केलेली अंतिम आकडेवारी यात मोठी तफावत येण्याबरोबरच जो प्रचंड वेळ ही आकडेवारी जाहीर करण्यास घेतला गेला, त्यामुळे पुन्हा एकदा विनाकारण निवडणूक आयोग वादात सापडला आहे. दोन-चार टक्क्यांचे मताधिक्य पुढेमागे झाले तर या राज्याचा निकाल बदलू शकतो हे लक्षात घेता खरे तर अत्यंत गांभीर्याने यावर बोलले पाहिजे. देशातील इतर मोठ्या राज्यात एका किंवा दोन तारखांमध्ये मतदान प्रक्रिया पार पाडली गेली. महाराष्ट्रात मात्र आयोगाने पाच टप्प्यांमध्ये मतदान घेतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रत्येक मतदारसंघात सभा घेण्यासाठी वेळ मिळावा आणि महाराष्ट्रात महायुतीच्या विरोधात वातावरण निर्माण झाल्यामुळे अशी रचना केल्याचा आरोप शरद पवार यांच्यापासून संजय राऊत यांच्यापर्यंत सर्व नेत्यांनी केला आहे. विशेष म्हणजे पंतप्रधानांनी सुद्धा २० पेक्षा जास्त सभा घेऊन त्यांच्या आरोपांना पुष्टी दिली आहे.

# जातीपातीच्या चक्रव्यूहात अडकू नका, जिल्हा समृद्ध करण्यासाठी पंकजाताईंना निवडून द्या- धनंजय मुंडे

बीड। प्रतिनिधी

**सध्या सुरु असलेली निवडणूक ही ग्रामपंचायत, जिल्हापरिषद किंवा विधानसभेची नाही तर ही निवडणूक देशाची निवडणूक आहे. त्यामुळे जातीपातीच्या चक्रव्यूहात अडकू नका. आपला देश समृद्ध करण्यासाठी आणि देशाबरोबर आपला बीड जिल्हा समृद्ध करण्यासाठी पंकताई मुंडेंना निवडून द्या. असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी नवगण राजुरी सर्कलमधली केतुरा गावात काल पार पडलेल्या विजयी संकल्प मेळाव्यात केले.**

काल दि. ४ मे रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान नवगण राजुरी सर्कलमधली केतुरा गावात शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, बबन बापू गवते, सचिन मुळूक, बळीराम गवते यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखली बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यासाठी प्रमुख उपस्थिती राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी, भाजप तथा शिवसेनेचे आणि रिपाईचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यासाठी नवगण राजुरी सर्कलमधून हजारोंच्या संख्यमध्ये जेष्ठ नागरिकांसह, महिला ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बबन बापू गवते यांनी सांगितले की, सातत्याने आम्ही राजुरी सर्कलमधून धनु भाऊ तुम्हाला पाठिंबा दिला आहे. आताही राजुरी सर्कलमधून पूर्ण ताकदीने सर्व जाती धर्मातून पंकजाताईना विजयी करा असे आवाहन मी ग्रामस्थांना करतो. शिवसेना आणि राष्ट्रवादी शिवाय नवगण राजुरी सर्कल कुणालाही थारा देणार नाही असे मी आश्वास्थ करतो आणि पंकजाताई मुंडे यांना लोकसभा निवडणुकीसाठी शुभेच्छा देतो. यादरम्यान ग्रामस्थांशी अनिलदादा जगताप यांनी संवाद साधला ते म्हणाले की, राजकारण आणि आरक्षण हे दोन्ही मुद्दे वेगवेगळे आहेत. तरीही विरोधक जाणीवपूर्वक आरक्षणावरून मराठा समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत, बुध्दीभेद करु लागले आहेत. मात्र समाज बांधव पंकजाताई यांना भरगच्च मतांनी निवडून देतील यात काही शंका नाही.



जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना नवगण राजुरी सर्कलमधून भरगोस मतांनी निवडून देण्यात यावे असे आवाहन करतो. अनिलदादा यांच्या आवाहनाला साद घालत उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजारात प्रतिसाद दिला. यानंतर विजयी संकल्प मेळाव्यात धनंजय मुंडे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, जिल्हयात सात लाख हेक्टर जमीन कोरडवाहू आहे ही सर्व जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी आपण पंकजाताई याना विजयी करा. महायुती म्हणून आम्ही सर्वजण एकदिलाने काम करत आहोत. जिल्ह्यात विकासाचे, सिंचनाचे अनेक प्रकल्प राबवत आहोत, राजकारणात मी सक्रिय झालो तेव्हा बीड जिल्ह्यात कधीच जातपात नव्हती. सर्व जातीचे लोक बीडमधून खासदार झाले, हा बीड जिल्ह्याचा सर्वधर्मसमभावाचा राजकीय इतिहास आहे. इथे जात पाहून नव्हे तर व्यक्तीचे कर्तृत्व पाहून उमेदवाराला निवडून देणारी जनता आहे. कोणी कोणाच्या जातीत जन्माला यावं हे आपल्या हातात नसत. त्यामुळे जातिवादाला महत्व देऊ नका. देश विकासासोबत जिल्ह्याचा विकास करण्यासाठी ही निवडणूक आहे. पंकजाताई मुंडे यांना खासदार म्हणून मोदींजींच्या पाठीशी उभे करा असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले. याप्रसंगी उप सभापती श्यामभाऊ पडुळे, पंचायत समिती सदस्य सचिन शेळके, बाजार समिती संचालक दीपक काळे, खरेदी विक्री संघांचे संचालक साहेबराव पोपळे, बीड विधानसभा प्रमुख सुनील भाऊ अनभुले, जिल्हा संघटक सुनील सुरवसे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष महादेव उबाळे, राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष नंदकुमार कुटे, शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर, शिवसेना उपजिल्हा प्रमुख संतोष जाधव, अजय जाधव, शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे, मधुकर शिंदे, सर्जेराव तात्या शिंदे, मधुकर महाराज शिंदे, सदाशिव सुर्वे, हनुमंत प्रसाद पांडे, बंटी धनवे, आकाश वडमारे, अनिकेत नाटकर, लक्ष्मणसिंह ठाकूर, आबासाहेब जाधव, शेख हुसेन, अरुण चौरे, योगेश बहिरवाड अवलपूर सोनगावचे सरपंच चंद्रकांत सपकाळ, रुद्रापूरचे सरपंच अशोक गिते, उप सरपंच गोरख अगाव, सरपंच पंऊगुळ सरपंच शिवमुर्ती तात्या सानप, उक्कडपिंपरी सरपंच जगनाथ पालवे, केतुरा उप सरपंच वसंत शिरसाठ, ग्रामपंचायत सदस्य हनुमान शिरसाठ, श्रीधर गायकवाड, सोमनाथ वांडरे, सुदर्शन घाडगे, हनुमान काशीद, रमेश काळे, सूर्यकांत जगताप, केशव घिगे, नवनाथ सोनसाळे, बाळासाहेब गात, खंबालिंबा गावाचे सरपंच बालाजी गिते यांच्यासह आजी माजी पदाधिकारी, सरपंच तथा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवगण राजुरी सर्कलमधील गावांच्या विकासाची गाव्ही धनंजय मुंडे यांनी यावेळी दिली. याबरोबरच श्री क्षेत्र नगद नारायण गडाच्या विकासासाठी पंचवीस कोटी राज्य सरकारने मंजूर केलेले आहेत. आणि यापुढेही नारायण गडाच्या विकासासाठी भविष्यात दोनशे पन्नास कोटींची जरी गरज लागली तरी मी आणि राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व महायुतीचे सरकार मागे हटणार नाही असे अश्वासन धनंजय मुंडे यांनी विजयी संकल्प मेळाव्यामध्ये दिले.

# सूचकता स्वभावात असावी सांगण्यात नको–भानुदास महाराज शास्त्री

शिरूर । प्रतिनिधी

**मानवी जीवन जगत असतांना सामाजिक भान ठेवून जीवन जगले पाहिजे, माणसे सुशिक्षित झाली पण सुसंस्काराचा मोठा अभाव पहायला मिळत आहे. सुशिक्षित असूनही त्यांना सांगण्याची दुर्दैवी वेळ येते. सूचकता ही माणसाच्या स्वभावात असावी सांगण्यात नको असे प्रतिपादन हभप. महंत भानुदास महाराज शास्त्री यांनी मौजे हाजीपूर येथे केले आहे.**

धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती वै. महंत महादेव महाराज संकल्पनेतून उभा करण्यात आलेला कासार तालुक्यातील मौजे हाजीपूर येथे विद्यमान महंत शिवाजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व हभप.शिवाजी महाराज मिसाळ यांच्या उपस्थितीत गेल्या चार दिवसापासून अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या थाटात पार पडत आहे. या सप्ताहात मध्ये हभप. महंत भानुदास महाराज शास्त्री ( श्रीराम संस्थान गोमळवाडा ) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. या कीर्तनाच्या माध्यमातून महंत भानुदास महाराज शास्त्री समाजात पहावायला मिळत असलेली अस्थिरता आणि सुशिक्षितपणाचा आवरून सुसंस्कारित जीवनाकडे लोक कशा पद्धतीने पाठ फिरवतात याबद्दल चिंतनात्मक जनजागृती केली. पुढे बोलताना महाराज म्हणाले वारकरी संप्रदाय आणि या संप्रदायाच्या माध्यमातून होणाऱ्या अध्यात्मिक कार्य हे यथोचितपणे पार पाडणे ही की तुम्हा आम्हा सर्वांची जबाबदारी आहे. मात्र याकडे तरुणाची पाठ फिरताना दिसत आहे. वेगवेगळ्या संस्कृतीचे अवलोकन करून आपल्या सुसंस्कृतपणाचा त्यांना विसर पडत आहे.



अशा लोकांना अनेक वेळा समजावून सांगूनही फरक पडत नाही. सुचकता ही माणसाच्या स्वभावात असायला हवी तिला सांगण्याची वेळ नको असे प्रतिपादन यावेळी महंत भानुदास शास्त्री यांनी केले यावेळी हभप. शिवाजी महाराज मिसाळ, भगवान महाराज उगले, प्रा. नारायण उगले सर, विठ्ठल महाराज, जालिंदर महाराज भोसले, किशोर महाराज उगले, कृष्णा महाराज घिगे, परमेश्वर उगले, मोहन उगले आदींची उपस्थिती होती.

# आष्टी येथे होणाऱ्या शरदचंद्रजी पवार यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे -प्रदिप थोरवे

बीड । प्रतिनिधी

**महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ सोमवार दिनांक ६ मे रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील ईदगाह मैदान येथे मा शरदचंद्रजी पवार साहेब यांची जाहीर सभा होणार असून सर्वांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आम आदमी संघटनमंत्री प्रदिप भैय्या थोरवे यांनी केले आहे.**



बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी संपूर्ण जिल्हा पिंजून काढला असून सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित झाला आहे.त्यामुळे आष्टी मतदार संघाचा विकास करण्यासाठी बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार साहेब ,भूषणसिंह राजे होळकर यांची आष्टी येथे सोमवारी सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार आहे.या सभेस उपस्थित. महेबूब शेख,आ.संदीप क्षीरसागर. जीवनराव गोरे. मा.आ सय्यद सलीम. मा आ साहेबराव दरेकर,,मा आ उषा दराडे, मा आ पुर्थ्वीराज साठे,मा आ बदामराव पंडित, मा आ राजेंद्र जगताप, सुशीला मोराळे,बबन गिते, शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा), परमेश्वर सातपुते, आष्टी विधानसभा राम खाडे, अण्णासाहेब चौधरी, कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, कॉंग्रेस तालकाध्यक्ष रवि ढोबळे, मिलींद आव्हाड मानव हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष,ऑल इंडीया पँथर दिपक भाई केदार ,डेमोक्ट्रीक पार्टी चे प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांगणे, अहमद पठाण, अ‍ॅड.किशोर मुळे, सुनील नाथ, अमोल तरटे, आप चे अशोक येडे, ऑल इंडिया पँथर जिल्हा अध्यक्ष उपस्थित राहणार आहे. तसेच आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रदिप भैय्या थोरवे यांनी केले आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या आयडियल प्रचारने महायुती, महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी घेतली धास्ती

## अशोक हिंगे यांना गावागावातून मिळतोय मोठा प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

**लोकसभे च्या प्रचाराचा दुसरा टप्पा संपत आला असून बीड जिल्ह्यात महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी अशी तिरंगी लढत दिसून येत आहे मात्र उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांच्या आयडियल प्रचाराने विजयाकडे वाटचाल चालू केली आहे गावोगावी,तांडा वस्तीवर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांचे जोरदार स्वागत करून वंचित बहुजन आघाडीलाच निवडून देणार असल्या ची हमी मतदार देत आहेत यामुळे महायुती, महाविकास आघाडी च्या उमेदवारानी धास्ती घेतली आहे तर त्यांचा प्रचार फीका पडला आहे.**

सध्या बीड लोकसभेच्या प्रचाराची रणधुमाळी जोरात चालू असून सर्वच पक्षांची प्रचारासाठी धावाधाव चालू आहे महायुती महाविकास आघाडी च्या दोन्ही उमेदवारांनी निवडणुकीला जातीचा रंग दिला आहे मात्र पुरोगामी महाराष्ट्रात जातिवादाला थारा मिळणार नाही इथे विकासावर निवडणुका होतात ही बाब लक्षात घेऊन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी आयडियल प्रचार चालू केला आहे प्रत्येक गावात जाऊन तेथील मूलभूत सुविधा सोडवण्याची हमी देत आहेत, तरुणांच्या हाताला काम, शेतकऱ्याच्या मालाला मुबलक दाम मिळवून देण्यासाठी मला संसदेत पाठवा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील करत आहेत त्यांच्या या आव्हानाला बीड जिल्ह्यातील सुज्ञ मतदाराकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे यामुळे महायुती महाविकास आघाडी च्या उमेदवारच्या पायाखालील वाळू सरकू लागली आहे महायुती, महाविकास आघाडीचा प्रचार अडगळीला पडत असल्याने वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा विजय निश्चित आहे

महाराष्ट्र मधून दिन दलित गोरगरीब मराठा, मुस्लिम, साळी माळी कोळी, हटकर, धनगर, वंजारी, बंजारा, चांभार कुंभार आदी घटकांसाठी काम करणारा पक्ष म्हणजेच वंचित बहुजन आघाडी हे महाराष्ट्रातील सुज्ञ मतदारांच्या लक्षात आले आहे त्यामुळे १३ मे रोजी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटीलयांच्या वर मतदान रुपी पडेल गॅस सिलेंडर चिन्हा समोरील बटन दाबून वंचितांचा आवाज लोकसभेत गेल्याशिवाय राहणार नाही असे चित्र आहे देशाला महागाईचा काहीतरी लोटणाऱ्या भारतीय जनता पार्टीला नरेंद्र भाई मोदी यांना सत्तेपासून दूर ठेवण्याची गरज असल्याचेही अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले प्रकाश आंबेडकरांचे हात बळकट करण्यासाठी घटनेचा संरक्षण करण्यासाठी वंचित बहुजन विकास आघाडी संसदेत जाणे खूप गरजेचे आहे अशोक पाटील यांनी सांगितले म्हणून गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्यानी विजयी करावे आसे आवाहन अशोक हिंगे पाटील यांच्या वतीने करण्यात येत आहे.त्या मध्ये शहराध्यक्ष लखन जोगदंड,अक्षय गायकवाड, अर्जुन गायकवाड, रोहित गायकवाड, सुजल गायकवाड, विजय गायकवाड, प्रकाश गायकवाड, अनिल वाघमारे, सुनील वाघमारे, मंगेश वाघमारे, शंतनू वाघमारे, ओमकार केदार, अभिमान केदार, अक्षय केदार, विनोद वडमारे, महेश सोनवणे, शुभम जाधव,राहुल जाधव, अक्षय जाधव, राहुल अड्डागळे, अनिल थोरात, जितेंद्र केदार, गौतम शिंदे, सचिन केदार, गणेश भांगे, रोहित कसबे, महेश वाघमारे, अनिल शिरसागर, अविनाश अडगळे, अंबादास गायकवाड, अभिजीत खांडेकर, गणेश ठोकळ,आदी सहभागी होते.



## पान १वरून...

### २०२६ असणार 'महिला

भेडसावणाऱ्या इतर आव्हानाबद्दल जागरुकता वाढविणे, या आव्हानांना तोंड देण्यासाठी कृतीशील उपाय शोधणे, आणि संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास लक्ष्याशी त्यांना संरेखित करण्याचा प्रयत्न करणे, विशेषत: लैंगिक समानता, अन्न सुरक्षा आणि गरिबी निर्मूलन याचा यात समावेश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटना संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने २ मे २०२४ रोजी स्वीकारलेल्या या ठरावाचे स्वागत केले.

-----------

### धसांच्या आष्टीत बजरंगाला

समाजासह इतर समाजातूनही त्यांना पाठींबा वाढत आहे. त्यामुळे बीड लोकसभेची लढत ही तिरंगी होणार आहे. सोनवणे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची दि. ६ मे रोजी सकाळी ११ वा. आष्टीत जाहीर सभा आहे. बजरंग सोनवणे यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून विरोधकांकडून मॅनेज उमेदवार म्हणून हल्लाबोल केलेला आहे. त्यामुळे आष्टीतील सोमवारच्या सभेत पवार काय बोलतात? पंकजाताई मुंडे यांच्याविषयी काय भुमिका घेतात? आणि धनंजय मुंडे यांनी जे आरोप, टिका केली त्याचा कसा समाचार घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच या सभेतून बजरंगांना पावर देतात की विरोधकांना ढिलाई देतात? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

------------

### केजमध्ये अवतरला पुष्पा;

(रा. कौडगाव, ता. केज) असे नाव सांगितले. यावेळी टेम्पोची झाडाझडती घेतली असता त्यात चंदन निघाले. हा चंदनाचा टेम्पो चंदनाच्या लाकडाचे मालक बालाजी उर्फ दत्तात्रय जाधव यांच्या सांगण्यावरुन जालना येथे घेऊन जात असल्याचे टेम्पो चालकाने पोलिसांना सांगितले. त्या टेम्पोत चंदन ठेवण्यासाठी पुष्पास्टाईल एक चोर कप्पा होता. त्यात चंदनाच्या ६० गोण्या ठेवल्या होत्या व मागच्या बाजूने भाजीपाला होता. चंदनाचे १२३५.५ कि.ग्रॅम वजन असून ते १ कोटी ९७ लाख ६८ हजार किमतीचे आहे. तर टेम्पोसह २ कोटी १८ लाख ३१ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन केज पोलिस ठाण्यात ३ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर चोरीच्या चंदनाच्या झाडाचा मालक बालासाहेब दत्तात्रय उर्फ बालाजी जाधव, रा. केज याचेविरुध्द यापुर्वी बर्दापुर आणि अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे २०२२ मध्ये गुन्हे दाखल आहेत. या कारवाईचे पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांनी कौतूक केले आहे. ही कारवाई अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग केज कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोउप नि. राजेश पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश मुंडे, सह फौ. जायभाये, खेडकर, पो. हवालदार निसार शेख, पो. हवालदार तुषार गायकवाड, भागवत शेलार, कैलास ठोंबरे, दिलीप गित्ते, मतीन शेख, शिवाजी कागदे, संतोष गित्ते, महादेव बहिरवाळ, प्रकाश मुडे यांनी केली आहे. बालाजी जाधव हे बीड लोकसभेचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे कार्यकर्ता आहे. त्यामुळे, या घटनेनं जिल्ह्यात खळबळ उडाली असून सध्या सुरू असलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघात या घटनेची चांगलीच चर्चा रंगली आहे. सध्या बजरंग सोनवणे यांच्या प्रचारादरम्यान बालाजी जाधव हा दिसत असल्याचे फोटो सोशल मिडीयावर व्हायरल होत आहेत. त्यामुळे विरोधकांच्या हाती आयतेच कोलीत आले आहे.

-------------

### जरांगे पाटील आज हाजीपूर

आठ दिवसापासून मोठ्या भक्तिमय वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताह पार पडत आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने ग्रामस्थांच्या वतीने संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या निमंत्रणाचा स्वीकार करून जरांगे पाटील हे हाजीपुर येथील सप्ताह सोमवार दि. ६ मे रोजी सकाळी ११ वाजता सदिच्छा भेट देणार आहेत. त्याचबरोबर या कार्यक्रमाला शिवाजी महाराजांची ही उपस्थिती लाभणार आहे जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी हाजीपुर ग्रामस्थांच्या वतीने जोरदार तयारी करण्यात आली आहे. फुलसांगवी ते हाजीपुर अशी सुमारे दोन किलोमीटर अंतरामध्ये रांगोळी फुलांची सजावट करण्यात येणार आहे. फुलसांगवी पासून जरांगे पाटील व महंत शिवाजी महाराज यांची संवाद्य मिरवणूक काढण्यात येणार असून काढण्यात येणार असून गावभर सुवासिनी महिलांच्या वतीने त्यांचे औक्षण ही करण्यात येणार आहे. त्यानंतर सप्ताहातील भाविक भक्तांना व मराठा समाज बांधवांना संबोधित करणार आहेत. तत्पूर्वी मनोज जरांगे पाटील हे फुलसांगवी येथील श्री. संत वामनभाऊ महाराज मंदिरामध्ये येऊन दर्शन घेणार आहेत येथील समाज बांधवाशी हितगुज करणार आहेत. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी व मराठा समाज बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे अवाहन हाजीपुर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

**महंत शिवाजी महाराज यांच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता**

गेल्या आठ दिवसापासून चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायणगड काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. त्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने उपस्थित भाविकांना उगले ( उपसरपंच हाजीपुर ) यांच्यावतीने महाप्रसादाची संगती देण्यात येणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविकांनी या सप्ताह सांगतेला उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

-----------

### निवडणूक जाहिरातीद्वारे भाजपा–शिंदे–पवार

भाजपासह महायुतीच्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करून त्यांच्यावर आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांच्या नेतृत्त्वाखाली कॉंग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने रविवारी राज्याच्या अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेऊन भारतीय जनता पक्षाने वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिराती विरोधात तक्रार केली. यावेळी माध्यमांशी बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, पहिल्या दोन टप्प्यात झालेले मतदान आपल्या विरोधात झाले आहे याची जाणिव झाल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी आता धार्मिक अजेंडा आणि पाकिस्तानला निवडणूक प्रचारात घेऊन आले आहेत. एका आघाडीच्या दैनिकात पहिल्या पानावर ''तुमच्या मताने कुठे जल्लोष व्हायला हवा आहे भारतात की पाकिस्तानात'' अशी जाहिरात दिली आहे. हा मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रकार आहे. भारतीय जनता पक्षाला भारत आणि पाकिस्तान मधला फरक कळत नाही का? असा संतप्त सवाल करून पंतप्रधान हतबल, निराश आणि वैफल्यग्रस्त झाले आहेत. १० वर्षात जनतेच्या हिताचे काही केले नाही, त्यामुळे मते मागण्यासाठी त्यांना पाकिस्तानचा आधार घ्यावा लागत आहे. पाकिस्तान मध्ये जाऊन बिर्यानी खाणारा, पाकिस्तानी गुप्तहेर संस्था आयएसआयला पठाणकोट येथे बोलावणारा पंतप्रधान पाहिजे की, चीनसमोर निधड्या छातीने उभा राहणारा, मणिपूर मध्ये जाऊन पीडितांची सांत्वन करणारा, कन्याकुमारी ते श्रीनगर अशी पायी भारत जोडो यात्रा काढणारा पंतप्रधान पाहिजे अशी जाहिरात आम्हीही देऊ शकतो पण आमच्याकडे कार्यक्रम आहे. त्यामुळे आम्हाला अशी गोष्टींची आवश्यकता नाही असेही सांगितले. पुढे बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, भारताच्या लोकसभेची निवडणूक सुरु आहे. देशातील विविध राजकीय पक्ष ही निवडणूक लढवत आहेत. पाकिस्तानातील राजकीय पक्ष ही निवडणूक लढवत नाहीत; मग देशातील जनतेने कोणत्याही पक्षाला मतदान केले तरी भारतातलाच एक पक्ष विजयी होणार आहे. भारताचे सरकार बनणार आहे याच्याशी पाकिस्तानचा संबंध काय? पण भाजपा आणि पंतप्रधान वारंवार खोटे बोलून जनतेची दिशाभूल करत आहेत हा आदर्श आचारसंहितेचा भंग तर आहेच त्यासोबतच भारतीय दंड संहितेच्या कलम १७१, लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम १२५, १५३, १२३ (३) नुसार गुन्हा आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली पाहिजे व भाजपासोबत ही जाहिरात देणारे त्यांचे मित्रपक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार, शिवसेना एकनाथ शिंदे यांच्यावरही कारवाई अशी मागणी केली. या शिष्टमंडळात लोंढे यांच्यासोबत, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या विधी विभागाचे अध्यक्ष अ‍ॅड. रवी जाधव, गजानन देसाई यांचा समावेश होता.

---------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ६ मे २०२४


## चारदरी परीसरात बिबट्या दोन जनावरे मारली शेतकरी हैरान वनविभागाचे मात्र दुर्लक्ष

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

तालुक्यात चारदरी डोंगरपट्टयात बिबट्या चा वावर वाढला असून सात दिवसात दोन जनावरे मारली असुन शेतकरी भयभीत झाले आहेत वनविभागा कडे तक्रार करून ही ते या कडे लक्ष देत नाहीत वरिष्ठ अधिका-यानी या कडे लक्ष देऊन तात्काळ या बिबट्याचा बंदोबंस्त करावा आशी मागणी या परीसरातील नागरीका कडून होत आहेशं

धारूर तालूक्यातील चारदरी परीसरात सात दिवसा पासून बिबट्याचा वालर वाढला असून बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दोन जनावरांचा मृत्यू झाल्याने नागरिकात भितीचे वातावरण निर्माण झाले असुन.चारदरी येथे सात दिवसां मध्ये व्हगलदरा या ठिकाणी बिबट्या सदृश्य प्राणीमार्फत जनावरवर हल्ले केल्यामुळे दोन गाईंचा मृत्यू झालेला आहे नागरिक भयभीत झालेले आहेत. वनविभाग मार्फत कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यास तयार नसल्याने नागरीकात भितीचे वातावरण निर्माण झाले नागरिक घरामधून बाहेर निघण्या रात्रीचे वेळी भित आहेत .याबाबत प्रशासनाला वारंवार विनंती करून सुद्धा त्यांनी तिची दखल घेतली नाही. तरी या प्रकरणांमध्ये पुढील काळामध्ये जर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्या ठिकाणी कायदा व सुचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. वनविभागाने तात्काळ या बिबट्याचा बंदोबंस्त करण्याची मागणी होत आहे.

# लोकसभा निवडणुक : प्रशासनाकडून परिपूर्ण तयारी निवडणूक अधिकारी यांची पत्रकार परिषदेत महिती

परळी । प्रतिनिधी

३९ बीड लोकसभा मतदार संघ अंतर्गत २३३ परळी विधानसभा मतदार संघात निवडणुकीची सूक्ष्मपणे परिपूर्ण नियोजन करण्यात आले असून रविवार दि ५ रोजी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. एकूण ३ लाख २६ हजार ३७४ मतदार ३४२ मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावणार असून याकामी २ हजार ८३६ अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

बीड लोकसभेच्या परळी विधानसभा मतदार संघात असलेल्या परळी,अंबाजोगाई तालुक्यातील मतदारासाठी ३४२ मतदान केंद्र असणार आहेत. ज्या मध्ये संपूर्ण महिला कर्मचारी असलेले सखी केंद्र ५ असणार असून ३ परळी शहरात तर २ घाटनांदूर येथे असणार आहेत. संपूर्ण दिव्यांग कर्मचारी असलेले १ केंद्र परळी शहरात असणार आहे. ३४२ पैकी ४ मतदान केंद्र हे संवेदनशील असून यावर प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले गेले आहे. या लोकसभा निवडणुकीत २२ हजार ३४० मतदार संख्या वाढून ३ लाख २६ हजार ३७४ एवढी झालेली असून या मतदारांचे मतदान प्रक्रिया सुलभपणे निर्भीड,निकोप वातावरणात संपन्न व्हावी यासाठी तब्बल २ हजार ८३६ अधिकारी, कर्मचारी कर्तव्य बजावणार आहेत.निवडणूक प्रक्रियेकरिता ४९० कंट्रोल युनिट, १ हजार २४८ बॅलेट युनिट आणि ५२९ व्हीव्ही पॅड मशीन वापरण्यात येणार आहेत.

संपूर्ण निवडणूक प्रक्रिये दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी सीआरपीएफ चे ९० जवान आणि ४५० पोलीस अधिकारी, कर्मचारी लक्ष देऊन असणार आहेत तर २ शासकीय वाहन, एस.टी महामंडळाच्या २९ बसेस, १८ खाजगी मिनी स्कुल बस, ६ खाजगी जीप तर क्षेत्रीय अधिकारी यांच्यासाठी ३६ खाजगी क्रूझर वाहन वापरात येणार आहेत.सर्वात कमी मतदार असलेले मतदान केंद्र मलकापूर हे तर सर्वाधिक मतदार असलेले केंद्र इमदादूल उलूम हे असणार आहे.या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान निरीक्षण करण्यासाठी एस.एस.टी ९, एफ.एस.टी ९, व्ही.व्ही.टी १, ए. टी १ व व्हि.एस.टी ५ असे २५ पथक देखरेख करणार आहेत. ३९ बीड लोकसभा मतदार संघ अंतर्गत २३३ परळी विधानसभा मतदार संघातील सोमवार दि १३ मे २०२४ रोजी संपन्न होणार असलेल्या या निवडणुकीबाबत माहिती देण्यासाठी रविवार दि ५ रोजी पत्रकार परिषद संपन्न झाली. या वेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी

अरविंद लाटकर (उपविभागीय अधिकारी), व्यंकटेश मुंडे (तहसिलदार,परळी),बाबुराव रुपनर (नायब तहसीलदार, परळी) यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय बीड व उपविभागीय कार्यालय परळी येथील निवडणूक विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## खर्च निरीक्षकांनी केली निवडणूक लेखांची तपासणी

### गैरहजर असणाऱ्यांना नोटीस बजावण्यात येईल



**बीड । प्रतिनिधी**

निवडणूक खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास यांनी आज निवडणुकीत उभे असलेल्या ३५ उमेदवारांच्या निवडणूक लेखांची तपासणी केली. गैरहजर असणाऱ्या उमेदवारांना नोटीस बजावण्यात येईल.

दि.४, दि.८, व दि.१२ मे रोजी निवडणूक लेखांची तपासणी केली जाणार असून आज पहिल्या टप्प्यातील निवडणूक लेखांची तपासणी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र () जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात आली. आज तपासणी झालेल्या उमेदवारांमध्ये अपक्ष उमेदवार अधिक होते.

उमेदवारांनी आतापर्यंत केलेल्या खर्चाची पावतीची नोंद निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या नोंदवहीत निट घेतल्या आहे की नाही याची तपासणी स्वतः खर्च निरीक्षक श्री बिस्वास यांनी केली. यावेळी उमेदवारांनी निवडणुकीच्या काळात निवडणूक खर्चासाठी उघडलेले बँक खाते त्यात जमा झालेली आणि खर्च झालेली रक्कम याचा ताळमेळ बसतो आहे का त्याची पाहणी करुन आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्याळी सुचविल्या. ज्या उमेदवारांनी अथवा प्रतिनिधींनी आज निवडणूक निरीक्षक यांच्यासमोर नोंदवही तपासून घेतली नाही त्यांना नोटीस बजावण्यात येईल. उमेदवारांकडून योग्य स्पष्टीकरण न आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे खर्च निरीक्षक यांनी सांगितले. पुढील तपासणी बुधवार दि.८ मे आणि रविवार दि.१२ मे रोजी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र () जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी १० ते सांय. ५ वाजेपर्यंत होणार आहे. ही तपासणी खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हेच करणार आहेत.



पिंपळवंडी: येथून जवळच असलेल्या पांगरी (मारुतीची) येथील हनुमंत देवताची यात्रा प्रतिवर्षाप्रमाणे मोठ्या जल्लोषात साजरी झाली.यात्रेला पंचक्रोशीतील पुरुष-महिला,युवक- मुलांनी गर्दी करून यात्रेचा आनंद घेतला.यात्रेत खेळणी तसेच मिठाईचे स्टॉल मोठ्या प्रमाणात थाटली होती.

## मुलींनी स्वतःचा स्वाभिमान जपावा-विजया मारोतकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मुलींनी कशाच्याही आहारी न जाता स्वतःचा स्वाभिमान जपला पाहिजे असे मत नागपुर येथील प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या विजया मारोतकर यांनी व्यक्त केले त्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीरातील व्याख्यानात मुलींनी मार्गदर्शन करताना बोलत होत्या अध्यक्षस्थानी संचालक आर.व्ही.सोनवळकर होते.



पुढे त्या म्हणाल्या की क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांना परंपरेच्या जोखडातून मुक्त केले, मुलींनी हे समजून घेवून स्वतःची उन्नती साधावी. समाजाची व पर्यायाने देशाची प्रगती साधावी

मुली,महिलांनी मोबाईलचा वापर फक्त आवश्यक कामासाठी जरूर करावा पण मोबाईलच्या आहारी जाऊन नये कारण अनेक मुलींचे आयुष्य यामुळे उद्ध्वस्त झाले आहे.हे समजून घेतले पाहिजे तरच भविष्यातले संभाव्य धोके दूर होतील असेही त्यांनी सांगितले.

संचालन व आभार शिबिरार्थी विद्यार्थिनींनी केले. यावेळी यो.शि.संस्थेचे मा.अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे,शिबीर प्रमुख तथा संचालक प्राचार्य भीमाशंकर शेटे,सहसचिव प्रा. एन.के.गोळेगावकर, प्राचार्य डॉ. व्ही.बी.साखरे आदीसह कर्मचारी उपस्थित होते.

## मोहम्मद पठाण इ.नववीत ९६% गुण मिळवुन शाळेत पहिला.

वडवणी । प्रतिनिधी

कवडगाव बु.येथील जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील* मोहम्मद फेरोज पठाण हा विद्यार्थी इयत्ता नववीत वार्षिक परिक्षेत ६००पैकीइतके गुण मिळवून शाळेत पहिला आला आहे त्याची टक्केवारी ९५.५०%एवढी आहे. तसेच द्वितीय क्रमांक शेख सदफ हाफिज ९३.८३ , तृतीय क्रमांक शेख उम्मेअकसा युसुफ, चतुर्थ करे अमृता महादेव ९०.८३ तसेच वर्ग आठवी मधीलव अकरावी वर्गातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले त्याच बरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थी गुणवत्ता अतिशय महत्त्वाकांक्षी असून ग्रामीण भागातील विद्यार्थी यांचा आत्मविश्वास वाढण्यासविवीध स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याची पात्रता व त्यांची खूप मोठी जिद्द स्कॉलरशिप परिक्षा मधून दिसून आली वर्ग आठवी मधील एकूण ८ विद्यार्थ्यांपैकी विद्यार्थिनी कुरेशी मागफिरा मुखिद, गोंदरे गौरी गणेश या विद्यार्थिनींचे यशाच्या जवळ गेल्या त्यांचेही व सर्व विद्यार्थ्यांचे व विद्यालयाचे वडवणी तालुक्या मधुन माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमा अंतर्गत मध्ये विद्यालयाचा तालुक्यात



तिसरा क्रमांक पटकावून बक्षिस मिळवले या निमित्त गावातील सर्व मान्यवर शिक्षणप्रेमी ,सर्व ग्रामस्थ , पालक , विद्यार्थी व शाळेतील सर्व कर्मचारी वर्ग यांचेही अभिनंदन संस्थेच्या अध्यक्षा मा. प्रा.सुशिलाताई मोराळे मॅडम , मा.सचिव डॉ. अजितजी पाखरे साहेब यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनं पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देवून विद्यार्थ्याचे अभिनंदन केले.तसेच गावातील मान्यवर प्रतिष्ठीत नागरिक शिक्षणप्रेमी, पालकवर्ग , आदि मान्यवर यांनी हार्दिक शुभेच्छा देल्या व अभिनंदन केले त्यांचे वर्ग शिक्षक घाडगे सर मुख्याध्यापक सारुक्ते सर व शाळेतील सर्व शिक्षकवृंद कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.तसेच गावांतील शिक्षण प्रेमी,प्रतिष्ठित नागरिक,अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या .

## आज ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील हातोला (खलाटवाडी) येथील श्री क्षेत्र राजे धर्माजी गड येथे दि.२९ एप्रिल ते ६ मे २०२४ दरम्यान सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाची सांगता आज दि.६ मे २०२४ सोमवार रोजी राजे धर्माजी गडाचे मठाधिपती ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री (भागवत भास्कर) यांचे काल्याचे किर्तनाने होत असून या किर्तनाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ हातोला व खलाटवाडी यांनी केले आहे.



यावेळी भाजपच्या राष्ट्रीय नेत्या पंकजाताई मुंडे,पालकमंत्री धनंजय मुंडे,खा.प्रितमताई मुंडे,भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, आ.सुरेश धस,आ.बाळासाहेब आजबे,मा. आ.भिमराव धोंडे,साहेबराव दरेकर,विजय गोल्हार आदिसह आजी माजी जि.प.सदस्य, पं.स.सदस्य आदिसह परिसरातील आजी-माजी सरपंच-उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य, चेअरमन तसेच भाविक -भक्तांची उपस्थिती लाभणार आहे.

## अंबाजोगाईत महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उद्या जाहीर सभा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात मगळवार दिनांक ७ मे रोजी सायं ५ वा.देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची जाहीर सभा कृषी महाविद्यालयाच्या ४८ एकर वरील विस्तीर्ण अशा प्रांगणात होणार आहे. या ठिकाणी मंडप उभारणीच्या कामाने वेग घेतला आहे. भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ ही जाहीर सभा होत असल्याने जिल्हाभरातून महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे प्रथमच अंबाजोगाई येथे येत असल्याने त्यांच्या स्वागताची जोरदार तयारी सुरू आहे जवळपास सहा हेलिपॅड्स उभारले जात आहेत



तसेच मंडप उभारणीच्या कामावर आ. नमिताताई मुंदडा जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा,कार्यकारी अभियंता गुरुलिंगेश्वर स्वामी उप अभियंता गोविंद मुंडे,प्रसिद्ध ठेकेदार प्रदीप ठोंबरे, विलास थोरात व इतर कार्यकर्ते पदाधिकारी नेतेगण लक्ष ठेवून आहेत. ३०० बाय ६०० फूट आकाराचा वॉटरप्रूफ मंडप उभारला जात आहे. जवळपास ४० हजार आसनक्षमता त्या ठिकाणी असणार आहे.त्यासोबतच इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची सभा ऐतिहासिक व्हावी यासाठी महायुतीच्या वतीने जोरदार तयारी सुरू आहे. मंडप उभारणीचे काम राष्ट्रीय स्तरावरील कंपनीकडे देण्यात आले आहे.

## सूचकता स्वभावात असावी सांगण्यात नको -भानुदास महाराज शास्त्री

### हाजीपूरमध्ये सप्ताहचे भक्तिमय वातावरण

**शिरूर । प्रतिनिधी**

मानवी जीवन जगत असतांना सामाजिक भान ठेवून जीवन जगले पाहिजे, माणसे सुशिक्षित झाली पण सुसंस्काराचा मोठा अभाव पहायला मिळत आहे. सुशिक्षित असूनही त्यांना सांगण्याची दुर्दैवी वेळ येते. सूचकता ही माणसाच्या स्वभावात असावी सांगण्यात नको असे प्रतिपादन हभप. महंत भानुदास महाराज शास्त्री यांनी मौजे हाजीपूर येथे केले आहे.

धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती वै. महंत महादेव महाराज संकल्पनेतून उभा करण्यात आलेला कासार तालुक्यातील मौजे हाजीपूर येथे विद्यमान महंत शिवाजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व हभप.शिवाजी महाराज मिसाळ यांच्या उपस्थितीत गेल्या चार दिवसापासून अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या थाटात पार पडत आहे. या



सप्ताहात मध्ये हभप. महंत भानुदास महाराज शास्त्री ( श्रीराम संस्थान गोमळवाडा ) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. या कीर्तनाच्या माध्यमातून महंत भानुदास महाराज शास्त्री समाजात पहावायला मिळत असलेली अस्थिरता आणि सुशिक्षितपणाचा आवरून सुसंस्कारित जीवनाकडे लोक कशा पद्धतीने पाठ फिरवतात याबद्दल चिंतनात्मक जनजागृती केली. पुढे बोलताना महाराज म्हणाले वारकरी संप्रदाय आणि या संप्रदायाच्या माध्यमातून होणाऱ्या अध्यात्मिक कार्य हे यथोचितपणे पार पाडणे ही की तुम्हा आम्हा सर्वांची जबाबदारी आहे. मात्र याकडे तरुणाची पाठ फिरताना दिसत आहे. वेगवेगळ्या संस्कृतीचे अवलोकन करून आपल्या सुसंस्कृतपणाचा त्यांना विसर पडत आहे. अशा लोकांना अनेक वेळा समजावून सांगूनही फरक पडत नाही. सुचकता ही माणसाच्या स्वभावात असायला हवी तिला सांगण्याची वेळ नको असे प्रतिपादन यावेळी महंत भानुदास शास्त्री यांनी केले यावेळी हभप. शिवाजी महाराज मिसाळ, भगवान महाराज उगले, प्रा. नारायण उगले सर, विठ्ठल महाराज, जालिंदर महाराज भोसले, किशोर महाराज उगले, कृष्णा महाराज घिगे, परमेश्वर उगले, मोहन उगले आदींची उपस्थिती होती.

## धारूर तालुक्यात पाच ठिकाणी सखी मतदान केंद्र




किल्ले धारूर । प्रतिनिधी

बीड लोकसभेचा मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाय योजना करण्यात येत आहेत त्याचाच एक भाग म्हणून धारूर तालुक्यात अरणवाडी भोपा संगम चिंचपूर सोनीमोहा या पाच ठिकाणी सखी पिंक बूथ मतदान केंद्र उभारले जाणार आहेत या ठिकाणी सहा व सात तारखेला वयस्कर दिव्यांग व इतर वयोवृद्ध व्यक्तींचे मतदान पार पडणार आहे या सखी मतदान केंद्राचा संपूर्ण कारभार महिला कर्मचारी पाहणार आहोत धारूर तालुक्यातील ८५ वर्षावरील व्यक्ती मतदान करणार आहेत भोगलवाडी कासारी या

### वयस्कर दिव्यांग व्यक्ती सहा व सात तारखेला मतदानाचा हक्क बजावणार

गावातील नागरिकांचा सहभाग राहणार आहे. धारूर तालुक्यात लोकसभा निवडणुकीचे मतदान शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी तालुक्यातील प्रशासन सज्ज झाले आहे निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी तहसीलदार जीवक कुमार कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक निर्णय अधिकारी नायब तहसीलदार सुरेश पाळवदे व कर्मचारी सज्ज झाले आहेत.

पान ६ वरून...

### येडेश्वरीच्या माध्यमातून ऊसाला

आहे. सामान्य माणसांसोबत त्यांनी जोडलेली नाळ पाहून बजरंग सोनवणे यांना जिल्हाभरात मतदारांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. यंदाही शेतकरी पुत्र विरुध्द धनशक्ती अशी लढत होत आहे. विरोधकांकडून जातीय राजकारण करुन सोनवणे यांचा एकतर्फी उल्लेख करत प्रचार होत असताना सोनवणे मात्र जातीवादावर प्रचार न करता विकासात्मक मुद्यांवर प्रचार करत आहेत. स्वत:च्या हिंमतीवर शेतकर्यांच्या ऊसाला सर्वाधिक भाव देणे आणि पारदर्शक कारभार या जोरावर शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे बीड लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. आहेत. याच शेतकरी पुत्राने अवघ्या नऊ महिन्यात येडेश्वरी साखर कारखान्याची उभारणी केली. सुरुवातीला ऊसाच्या प्रश्नापासून आर्थिक अडचणींवर मात करत कारखाना सुरु केला. आज येडेश्वरी बीड जिल्ह्यात सर्वाधिक उसाला भाव देणारा कारखाना म्हणून गेल्या कित्येक वर्षापासून बहुमान मिळवत आहे. शेतकरी पुत्राचा कारखाना, रोख व पारदर्शक व्यवहार यामुळे शेतकर्यांचीही येडेश्वरीला पहिली पसंती आहे. वडवणी, धारुर, केज, अंबाजोगाई, परळी या भागातील ऊसासह बीड, गेवराई तालुक्यातील ऊस उत्पादकांनाही येडेश्वरीचा आधार मिळत आहे. सर्वसामान्य माणूस आणि शेतकरी केंद्रबिंदू मानून बजरंग सोनवणे यांनी आजपर्यंतच्या राजकीय जीवनात केलेले प्रामाणिक कार्य आज त्यांच्या कामाला आले आहे. त्यांनी शेतकर्यांना दिलेला विश्वास यामुळे शेतकरी व सामान्य माणूस आज बजरंग सोनवणे यांच्या पाठिशी उभा आहे.

दरम्यान येडेश्वरीकडून ४ ऑगस्ट २०२१ रोजी चिपळूण तालुक्यातील चिपळूण, कोलकेवाडी, वडारवस्ती, कळमबसते या गावातील पूरग्रस्त कुटूंबांना १५ दिवस पुरेल अशा जीवनावश्यक किराणाचे किटचे १२५ गरजू पूरग्रस्त कुटूंबांना वाटप करण्यात आले. सामान्य माणसापासून शेतकर्यांपर्यंत सर्व प्रश्नांची जाण असलेल्या या शेतकरी पुत्राचा आवाज यंदा लोकसभेत घुमणार हे स्पष्ट आहे.

# रासायनिक खतांच्या किंमतीत मोठी वाढ

## शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसणार

पुणेः आगामी खरीप हंगामापूर्वी रासायनिक खतांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार असून, शेतमालाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ होणार आहे. शेतीसाठी रासायनिक खतांचा वापर जवळपास अनिवार्यच झाला आहे. त्यामुळे शेतीच्या उत्पादन खर्चात रासायनिक खताच्या किमती महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यात गेल्या काही वर्षांत सततची वाढच होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडत आहे.

शेतकऱ्यांना सध्या १०.२६.२६ खताची गोणी १४७० रुपयांना मिळते. जी आता १७०० रुपयांना मिळणार आहे. खताची २४.२४.० ही गोणी सध्या १५५० रुपयांना मिळते. जी आता १७०० रुपयांना मिळणार आहे. याशिवाय २०.२०.०.१३ ही खताची गोणी १२५० रुपयांना मिळते. जी आता १४५० रुपयांना मिळणार आहे. सुपर फॉस्फेटची गोणी सध्या ५०० रुपयांना मिळते. जी आता नवीन दरानुसार ६०० रुपयांना मिळणार आहे. अर्थात मिश्र खते, सुपर पोटॅशच्या दरातही मोठी वाढ



झाली असून, त्यासोबतच डिझेलचे दर वाढल्याने ट्रॅक्टरच्या आधारे होणाऱ्या आंतरमशागतीच्या खर्चातही मोठी वाढ झाली आहे. ट्रॅक्टरने होणाऱ्या नांगरणीच्या खर्चात प्रति एकर ३०० रुपयांपर्यंत

### शेतमालाचे दर मात्र घटते

दरम्यान, शेतीच्या उत्पादन खर्चात वाढ होत असताना शेतमालाच्या भावात मात्र घट होत आहे. यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. उत्पादन खर्चात सर्वात महत्त्वाचा घटक असलेल्या खतांच्या भावातच वाढ होत असल्याने शेती आता आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही. अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहे.

वाढ खोल नांगरणीचा खर्च दोन हजार रुपये प्रति एकरवर पोहोचला आहे. ज्यामुळे यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ होणार आहे. ज्यामुळे यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी मोठी आर्थिक कसरत करणारा ठरणार असून, या हंगामात शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागण्याची शक्यता आहे.

# लवकर काढणीला येणारे कापूस वाण



कापूस हे महाराष्ट्रात उत्पादित होणारे एक महत्त्वाचे पीक आहे. या पिकाची आपल्या राज्यातच नाही तर संपूर्ण भारतभर लागवड केली जाते. कापूस शेती खरीप हंगामात होते. दरम्यान भारतीय हवामान विभागाने यंदा समाधानकारक मान्सूनची शक्यता वर्तवली असल्याने यावर्षी कापूस लागवडीखालील क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता देखील आहे. अशातच लवकर काढणीसाठी येणारे चांगले वाण कोणते? असा प्रश्न शेतकऱ्यांच्या माध्यमातून सातत्याने उपस्थित होत असतो.

'हे' आहेत लवकर काढणीला येणारे वाण : कबड्डी – महाराष्ट्रात सर्वाधिक लोकप्रिय वाण म्हणून याची ओळख आहे. हा वाण राज्यातील मराठवाडा आणि विदर्भ या दोन विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात लावला जातो. उत्तर महाराष्ट्रात मात्र या जातीचे लागवडीखालील क्षेत्र कमी आहे. या जातीबाबत बोलायचं झालं तर याचे बोंडाचे हे सहा ते आठ ग्रॅम एवढे भरते. १६० दिवसात या जातीचे कापूस पीक परिपक्व होते. जिरायती आणि बागायती अशा दोन्ही परिस्थितीत त्याची लागवड होऊ शकते. जर जिरायती भागात लागवड केली असेल आणि हलकी जमीन असेल तर सहा ते सात क्विंटल, मध्यम जमीन असल्यास आठ ते नऊ क्विंटल आणि भारी जमीन असल्यास दहा ते अकरा क्विंटल चे उत्पादन मिळू शकते. बागायती भागात लागवड केल्यास या जातीपासून १७ ते १८ क्विंटल एवढे विक्रमी उत्पादन मिळत असल्याचा दावा तज्ञांनी केला आहे. विशेष म्हणजे हवामान बदलास देखील ही जात चांगली आहे. म्हणजे जास्तीचा पाऊस पडला तरीही आणि कमी पाऊस असला तरीही या जातीपासून बऱ्यापैकी उत्पादन मिळू शकते. विशेष म्हणजे विविध कीटकास आणि रोगास देखील ही जात प्रतिकारक असल्याचे आढळून आले आहे.

रासी ६५९ – या जातीचे पीक १५५ ते १६० दिवसात परिपक्व होत असल्याची माहिती तज्ञांनी दिली आहे. हा वाण खालच्या जमिनीसाठी सर्वोत्कृष्ट आहे. मात्र काळ्या कसदार जमिनीत या जातीपासून अपेक्षित उत्पादन मिळत नसल्याचे म्हटले जात आहे. कोरडवाहू भागात या जातीपासून चांगले उत्पादन मिळत आहे. या जातीचे पिक वेचणीला सोपे आहे. रासी निओ – या जातीचे पीक १५५ ते १६५ दिवसात परिपक्व होते. या जातीचा कापूस हा २७ एमएम धागा असणारा आहे. म्हणजेच या कापसाचा मध्यम धागा असतो. हलक्या जमिनीसाठी योग्य आहे. बागायती भागात आणि भारी जमिनीत या जातीपासून अपेक्षित उत्पादन मिळत नसल्याचे सांगितले जात आहे.

अजित १५५ – या जातीचे पीक १६० दिवसांत परिपक्व होते. हलक्या जमिनीत लागवड केली तरीसुद्धा बारा क्विंटल पर्यंतचे उत्पादन मिळू शकते. बागायती आणि जिरायती भागात लागवड केली जाऊ शकते. मात्र हा कापूस वेचणीस किचकट असल्याचे म्हटले जात आहे.

# निंबोळी अर्काच्या वापराने कीटकनाशक खर्चात होते २५ टक्के कपात

खरीप हंगामात पिकांवर किडींचा प्रादुर्भाव वाढल्यानंतर कीटकनाशकांची फवारणी वारंवार करावी लागते. कीटकनाशकांच्या किमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांचा बराच खर्च वाढतो. हा उत्पादन खर्च टाळण्याकरिता शेतकऱ्यांनी निंबोळी अर्काचा वापर करणे गरजेचे असते. त्याकरिता सध्याच्या रिकाम्या दिवसांमध्ये उन्हाळ्यातच निंबोळी गोळा करून ठेवण्याची आवश्यकता आहे. याच पार्श्वभूमीवर आज आपण सविस्तर माहिती जाणून घेणार आहोत.

पिकलेल्या व जमिनीवर पडलेल्या निंबोळ्या गोळा करून, चांगल्या वाळवून, कोरड्या जागेत साठवाव्यात. ५ टक्के निंबोळी अर्काची २ हेक्टर कपाशी, तूर, हरभरा पिकांवर दोनवेळा फवारणी केल्यास रासायनिक कीटकनाशकांच्या खर्चात २० ते २५ टक्क्यांपर्यंत बचत होते. तसेच पेरणीपूर्वी सर्व बियाण्यांची उगवणशक्ती घरीच तपासावी, बियाण्याची उगवण क्षमता ७० ते ८० टक्क्यांपर्यंत असल्यास पेरणीसाठी बियाणे वापरावे. निंबोळी अर्काच्या वापरामुळे हेक्टरी झाडांची योग्य संख्या राहून, चांगले उत्पादन मिळते. माती परीक्षण अहवालाच्या शिफारशीनुसार रासायनिक खतांच्या मात्रा द्याव्यात.

त्यामुळे रासायनिक खतांच्या मात्रेत बचत करता येईल. खत मात्रा उशिरा दिल्यास पिकांच्या उत्पादनात घट येते. मध्यम, खोल आणि उथळ जमिनीत पिकांची पेरणी जूनच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा अंदाज घेऊन करावी. आणि या पिकांना गरजेनुसार निंबोळी अर्काचा वेळोवेळी वापर करावा, असे कृषी तज्ज्ञांकडून सांगण्यात आले आहे.

कसा तयार करतात निंबोळी अर्क?

५ किलो निंबोळया गोळा करून त्या सावलीत वाळवाव्यात आणि फवारणीच्या १ दिवस अगोदर त्या कुटुन बारीक कराव्यात आणि ९ लिटर पाण्यात रात्रभर भिजु घालावे. तसेच २०० ग्रॅम साबणाचा चुरा किंवा वॉशिंग पावडर १ लिटर पाण्यात वेगळा भिजत घालावा. दुसऱ्या दिवशी सकाळी लाकडी काठीने ते द्रावण दुधासारखे दिसेपर्यंत ढवळावे. द्रावण ढवळुन झाल्यावर निंबोळी अर्क स्वच्छ पातळ कापडाने गाळुन घ्यावे आणि त्यात साबनाचे द्रावण मिसळावे, अशा रीतीने निंबोळीचा ५ टक्के अर्क तयार होतो. हा सर्व अर्क १०० लिटर होईल एवढे पाणी टाकावे व फवारणीसाठी वापरावे.

निंबोळी अर्क वापरण्याचे फायदे :निंबोळी खर्च अत्यल्प असतो. नैसर्गिक असल्याने प्रदूषण होत नाही. निंबोळी अर्क बनवणे. हाताळने व वापरणे सोपे आहे.

घातक किडींना प्रतिबंध, नियंत्रित करीत असले तरी नैसर्गिक शत्रू, मित्र किटकांसाठी फारसे हानीकारक ठरत नाही. रासायनिक कीटकनाशकांचा द्वारे होणारे दुष्परिणाम टाळून पर्यावरणाचा समतोल टाळता येईल. निंबोळी अर्क / पेंड वापरल्यामुळे जमिनीतील सुत्रकृमी, मुळे कुरतडणाऱ्या अळ्या नियंत्रित होतात.



# दुधातील फॅट वाढवण्यासाठी उपाययोजना

पशुपालन व्यवसायामध्ये दूध उत्पादनाला अनन्यसाधारण महत्त्व असून, दूध उत्पादन हेच पशुपालकांचा आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत आहे. दूध उत्पादनामध्ये दुधाचा फॅट हा खूप महत्वपूर्ण असून, दुधापासून मिळणारे आर्थिक उत्पन्न हे दुधातील फॅटवरच अवलंबून असते. बर्याच कारणांमुळे दुधातील फॅट कमी लागतो व शेतकऱ्यांना मिळणारा पैसा साहजिकच कमी होतो. त्यामुळे काही सोपे उपाययोजना आणि व्यवस्थापनाविषयी बारकाईने लक्ष दिले. तर पशुपालकांना त्याचा फायदा फॅट वाढण्यावर होतो व त्यांचे आर्थिक उत्पन्न आपोआपच वाढते.

दुधातील फॅट का कमी होतो? : जनावरांचा आहार : जनावरांना जो काही आहार दिला जातो त्याच्यावर दुधाचा फॅटचे सगळे गणित अवलंबून असते. आपले शेतकरी गाईंना किंवा म्हशीना काही खाद्य देतात त्या सोबत तेलाचा वापर करतात. जसे के जनावरांच्या आहारात सरकीच्या तेलाचा अंश जरी असला तर त्यामुळे दुधाचा फॅटमध्ये थोडी वाढ संभवते. परंतु आहारातील स्निग्ध पदार्थांचे प्रमाण वाढल्यास जनावरांच्या प्रजनन क्षमतेवर वाईट परिणाम होऊन दुधाचे प्रथिनांमध्ये



घट येते.

हवामानाचा परिणाम : जर आपण हिवाळ्याचा विचार केला तर हिरवा चारा मुबलक प्रमाणात असतो त्यामुळे दुधाच्या उत्पादनात वाढ होते परंतु फॅटचे प्रमाण कमी होते. यासोबतच उन्हाळ्या ऋतूमध्ये कोरडे वैरणीचा समावेश असल्याने दुधातील स्निग्धांश वाढतात. एवढेच नाही तर उन्हाळ्यामध्ये तापमान जास्त असल्यामुळे जनावरे जास्त पाणी पितात व कमी चारा खातात. त्यामुळे जनावरांच्या शरीराचे तापमान वाढल्यामुळे दूध उत्पादन आणि दुधातील स्निग्धांशाचे प्रमाण कमी होते.

कासदाह आजार : म्हशींना किंवा गाईंना कासदाह आजाराची लागण झाली तर यामुळे देखील दुधातील फॅटचे प्रमाण सरासरीपेक्षा जवळजवळ निम्मी कमी होतो. दूध काढण्याची वेळ खूप महत्वपूर्ण– दूध आपण दोन वेळेस काढतो, यात दूध काढण्याच्या दोन वेळा मध्ये जास्तीत जास्त बारा तासाचे अंतर असणे गरजेचे आहे.अंतर वाढल्यास दुधाचे उत्पादन वाढते परंतु फॅट कमी होतो.

दुधातील फॅट वाढवण्यासाठी उपाययोजना :

दूध काढताना जनावरांची कास स्वच्छ धुवावी. कासेतील रक्ताभिसरण वाढेल. दुधातील स्निग्धांशाचे प्रमाणात देखील वाढ होईल व दूध सात मिनिटांमध्ये पूर्णपणे काढावे. जनावरांच्या दैनंदिन आहारात हिरव्या चाऱ्याबरोबर वाळलेल्या वैरणीचा समावेश करावे. उसाच्या वाड्यांचा वापर टाळावा. भाताचा पेंढा, गव्हाचा काड इत्यादी प्रकार असा निकृष्ट चारा दिल्यामुळे दूध उत्पादन व दुधातील फॅट कमी होतात. गाई– म्हशींना खाद्य म्हणून खाद्यतेलाच्या पेंडी, मक्का, भरडा, तुर, हरभरा, मुगचुनी, गव्हाचा कोंडा इत्यादी योग्य प्रमाणात द्यावे. बारीक दळलेले धान्य किंवा तेल देऊ नये.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१५२९ : घाघरा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी बंगाल आणि बिहारच्या शासकांचा पराभव केला.
१५३६ : इंग्लंडचे राजा हेनरी अष्टम यांनी प्रत्येक गीरीजाघरात बाईबल हे धार्मिक पुस्तक ठेवण्यास सांगितले.
१५४२ : सेंट फ्रान्सिस झेव्हिअर तत्कालीन पोर्तुगीज गोव्याची राजधानी ओल्ड गोवा येथे पोहोचला.
१६३२ : शहाजहान बादशहा व आदिलशहा यांच्यामधे शहाजीला पराभूत करण्याबद्दल तह झाला.
१८१८ : वैशाख शु. १ शके १७४० राजधानी रायगड लढवत असताना शेवटच्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इंग्रजांकडून पराभूत झाली.
१८३५ : अमेरिकन वर्तमानपत्र न्यूयॉर्क हेरॉल्ड चे प्रकाशण करण्यास सुरुवात झाली.
१८४० : एक पेनी किमतीचे 'पेनी ब्लॅक' नावाचे जगातील पहिले टपाल तिकीट इंग्लंडमध्ये विक्रीसाठी खुले झाले. हे तिकीट १ मे १८४० रोजी जारी झाले होते.
१८८९ : पॅरिसमधील 'आयफेल टॉवर'चे उद्घाटन झाले.
१९१० : ब्रिटीश शासक एडवर्ड सप्तम यांच्या निधनानंतर त्यांची गाद्दी त्यांचे पुत्र जॉर्ज पंचम यांनी सांभाळली.
१९४४ : पुणे येथील आगा खान पॅलेस मधून महात्मा गांधी यांची सुटका झाली.
१९४९ : ईडीएसएसी पहिले इलेक्ट्रॉनिक डिजिटल संचलित संगणक सॉफ्टवेअर सुरु झाले.
१९५४ : रॉजर बॅनिस्टर हे १ मैल चार मिनिटांच्या आत धावणारे पाहिले व्यक्ती ठरले.
१९८३ : अडोल्फ हिटलर यांच्या डायरीचा लबाडी म्हणून खुलासा केला गेला.
१९९४ : इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकॉइस मित्राँ यांच्या हस्ते इंग्लिश खाडीखालुन जाणार्या आणि इंग्लंड व फ्रान्स यांना जोडणार्या 'युरो टनेल'चे उद्घाटन झाले.
१९९७ : 'बँक ऑफ इंग्लंड'ला स्वायत्तता देण्यात आली.
१९९९ : महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांत महिलांना तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. अस निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
२००१ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी सिरीयातील एका मशिदीस भेट दिली. मशिदीस भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
२००२ : भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१५ : सलमान खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपास दोषी ठरवून ५ वर्ष्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच सलमान खान यांची हायकोर्टात अपील दाखल करून, जामिनावर सुटका.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३९)
१८६१ : मोतीलाल गंगाधर नेहरू भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३१)
१९२० : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (मृत्यू: २४ मे १९९३ मुंबई)
१९४० : प्रसिद्ध महिला तबलावादक, गायिका आणि संगीतज्ञ अबन मिस्त्री यांचा जन्म.
१९४३ : लेखिका वीणा चंद्रकांत गावाणकर यांचा जन्म.
१९५१ : लीला सॅमसन भरतनाट्यम नर्तिका, नृत्यदिग्दर्शिका आणि लेखिका. संगीत नाटक अकादमी आणि फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षा
१९५३ : टोनी ब्लेअर ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे अध्यक्ष
१९६४ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय जलतरणपटू खजान सिंह यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : रामतनू पांडे ऊर्फ मोहमाद आट्टा खान तथा संगीतसम्राट तानसेन अकबराच्या दरबारातील एक नवरत्न (जन्म: ? ? १५०६)
१८६२ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (जन्म: १२ जुलै १८१७)
१९२२ : छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (जन्म: २६ जून १८७४)
१९४६ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे 'गांधी–आयर्विन' कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकऱ्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (जन्म: १३ आक्टोबर १८७७)
१९५२ : मारिया मॉंटेसरी इटालियन डॉक्टर व शिक्षणतज्ञ. पूर्वप्राथमिक शिक्षणाविषयीच्या त्यांच्या उपक्रमामुळे तशा शाळा 'मॉंटेसरी' या नावाने ओळखल्या जातात. (जन्म: ३१ ऑगस्ट १८७०)
१९६६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (जन्म: १६ फेब्रुवारी १८७६)
१९९५ : आचार्य गोविंदराव गोसावी प्रवचनकार, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, हैदराबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक (जन्म:)
१९९९ : कृष्णाजी शंकर हिंगवे पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल व संस्थापक सदस्य (जन्म:)
२००१ : विख्यात मराठी कादंबरीकार, लेखिका मालतीबाई बेडेकर यांचे पुणे येथे निधन.
२००६ : जगातील सर्वात मोठे प्रवासी जहाज टायटनिक च्या दुर्घटनेचे साक्षीदार अमेरिकन नागरिक लिलियन एस्प्लंट यांचे निधन.

## थोडक्यात

### ६, १०, ११ आणि १२ मे रोजी पोस्टल मतदान

बीड : बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणारे २३० बीड विधानसभा मतदारसंघात दि.६, दि.१०, दि.११ आणि दि.१२ मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार आहे. भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बीड लोकसभा मतदारसंघात इतर दहा जिल्ह्यातील मतदार असलेले मतदारांना यामध्ये अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस यांचा समावेश असून ते दि.६, दि.१० आणि दि.११ मे रोजी तहसील कार्यालयातील, तहसीलदार यांच्या दालनात पोस्टल मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे तेथे मतदान करू शकतात. तर दि.१२ मे रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती ( एपीएमसी) येथे सुविधा केंद्र स्थापन करण्यात येणार असून येथेही उर्वरित अधिकारी, कर्मचारी मतदान करू शकतील.


### सखाहारी तात्याबा डोंगरे यांचे निधन

वडवणी : वडवणी तालुक्यातील कोठरबन येथील आंबेडकरी चळवळीतील आग्रेसर आसनारे सखाहारी तात्याबा डोंगरे याचं ३.५.२०२४ राहत्या घरी दुःखद निधन झाले.ते ७० वर्षाचे होते.त्यांच्या पश्चात पत्नी सोमित्राबाई सखाहारी डोंगरे चार मुलं १) लक्ष्मण डोंगरे, तुकाराम डोंगरे,बाळासाहेब डोंगरे,व सामाजिक चळवळीमध्ये सतत आग्रेसर आसनारे विभीषण डोंगरे तसेच तीन मुली १)रंदावणी, मंदाकिनी,वंजीतबाई यांच्या सह सुना, पुतने, नातवंडे,नातसुना आसा मोठा परिवार आहे.त्यांच्या जाण्याने डोंगरे परिवारावर दुखा चा डोंगर कोसळला आहे.वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यात राहणारे सखाहारी तात्याबा डोंगरे चार मुलं व तीन मुली आसतांना परिस्थिती अंत्यात बीकट मात्र जिद आणि चिकाटी व हिम्मतवाले आसल्याने सहज संकटाला पळवून लावायचे आशा परिस्थिती मध्ये कोठरबनचे ग्रामपंचायत सदस्य राहिले आणि सोसायटीचे सुद्धा सदस्य राहिले होते.अंत्यांन्त मनमिळावू स्वभावामुळे गावामध्ये त्यांच्या शब्दाला मान होता.परंतु काही दिवसापूर्वी सखाहारी डोंगरे यांच्या पायाला दुखापत झाल्याने ते आजारी पडले मात्र दि ३.५.२०२४ रोजी त्यांची प्राणज्योत मावळली त्यांच्या जाण्याने कोठरबन गावावर शोककळा पसरली आहे.डोंगरे परिवाराला या सावरण्याची शक्ति मिळो अशी बौद्ध चरणी प्रार्थना व डोंगरे परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.



### जानकीबाई पौळ यांचे निधन

बीड : शहरातील माजी नगरसेवक अमोल सटवाराम पौळ यांची आजी जानकीबाई लिंबाजी पौळ ( वय १०४ ) यांचे वृद्धापकाळाने दि.४ मे रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी त्यांच्या मूळ गावी वडवणी तालुक्यातील देवगाव येथे दि.५ मे रोजी सकाळी १०,३० वा. होणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे ,पथरूड ,असा मोठा परिवार आहे.



### आज रोहिदास महाराज शास्त्री यांचे किर्तन

पिंपळवंडी : आष्टी तालुक्यातील हातोला (खलाटवाडी) येथील श्री क्षेत्र राजे धर्माजी गड येथे दि.२९ एप्रिल ते ६ मे २०२४ दरम्यान सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याची सांगता आज दि.६ मे २०२४ सोमवार रोजी राजे धर्माजी गडाचे मठाधिपती ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री (भागवत भास्कर) यांचे काल्याचे किर्तनाने होत असून या किर्तनाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ हातोला व खलाटवाडी यांनी केले आहे. यावेळी भाजपच्या राष्ट्रीय नेत्या पंकजाताई मुंडे,पालकमंत्री धनंजय मुंडे,खा.प्रितमताई मुंडे,भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, आ.सुरेश धस,आ.बाळासाहेब आजबे,मा. आ.भिमराव धोंडे,साहेबराव दरेकर,विजय गोल्हार आदिसह आजी माजी जि.प.सदस्य, पं.स.सदस्य आदिसह परिसरातील आजी- माजी सरपंच-उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य, चेअरमन तसेच भाविक -भक्तांची उपस्थिती लाभणार आहे.

### नाथापूर येथे चार ठिकाणी चोरी

नाथापूर: बीड तालुक्यातील नाथापूर येथे दि.४/५/२०२४ रोजी संध्याकाळी पाळत ठेऊन चार ठिकाणी घरफोडीचा प्रकार घडला आहे.शनिवार हा दिवस नाथापूर येथील आठवडी बाजाराचा असून याचं संधीचा फायदा घेऊन रेकी करण्यात आली असल्याचे समजते.दिवसा रेकी करून संध्याकाळी चार ठिकाणी घरफोडी करण्यात आली.यामध्ये लाखो रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आल्याचे बोलले जात असून.गाव परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या आगोदरही काही महिन्यापूर्वी झालेल्या चोरीचा अद्याप छडा लावण्यात पिंपळनेर पोलिसांना अपयश आलेले असून आत्ता तरी या चोरीच्या घटनेचा तपास पंपळनेर पोलीस लावणार की नाही अशी शंका गावकर्याकडून व्यक्त केली जात आहे.सदरील चोरी करणारा व्यक्ती एका घराच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेला असून तात्काळ या गुन्ह्यांचा शोध पोलीस प्रशासनाने लावावा अशी मागणी पीडिताना केली आहे.

# बस स्थानक परीसर, साठे चौक, नगर रोडवरील अतिक्रमण हटवले





## वाहतूक शाखेची बीड शहरात कारवाई

### अतिक्रमणे स्वतःहून काढून घ्या- स.पो.नि. सानप

शहरात वारंवार अतिक्रमणे वाढत असुन या विरुद्ध वारंवार कारवाई करावी लागते. व्यापाऱ्यांनी स्वतःहून आपापली अतिक्रमणे काढून घ्यावीत आपले शेड ,साइन बोर्ड, अँगल स्वतःहून हटवावेत असे आवाहन सं.पो.नि. सुभाष सानप यांनी केले असून जर स्वतःहून अतिक्रमणे हटवलली नाहीत तर शहर वाहतूक शाखा कारवाई करेल. असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील बस स्थानक परीसर, साठे चौक आणि नगर रोडवर असलेली अतिक्रमण साईन बोर्ड, शेड, समोर आलेले अँगल वाहतूक शाखेच्या पोलिसांनी हटवले ही कारवाई शुक्रवारी करण्यात आली. व्यापाऱ्यांनी स्वतःहून आपापली अतिक्रमणे आठवावेत असे आवाहन वाहतूक शाखेचे स.पो.नी.सुभाष सानप यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसापासून बीड शहर बस स्थानक परीसर,साठे चौक आणि नगर रोड परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढल्याच्या तक्रारी येत होत्या. या तक्रारीवरून वाहतूक शाखेचे स.पो.नि. सुभाष सानप व त्यांच्या टीमने या भागातील साईन बोर्ड, अँगल आदी अतिक्रमणे हटवली. ही कारवाई सपोनी. सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हेड कॉन्स्टेबल रवींद्र नागरगोजे, संजय घोडके, बाळासाहेब नागरगोजे, गोविंद सारुक, पांडुरंग दराडे ,पोलीस नाईक आदिनाथ मुंडे, नितीन काकडे, मिलिंद सारणीकर पोलीस वाहन चालक वाघमारे यांनी संयुक्तपणे केली. यापुढेही कारवाई सुरूच राहणार असून कोणीही रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करू नये, अतिक्रमण धारकांनी आपापले साईन बोर्ड, शेड स्वतःहून काढून घ्यावेत असे आवाहन स.पो.नि. सुभाष सानप यांनी केले आहे.

या कारवाईचे बीड शहर वासीयांकडून स्वागत होत असून शहरात झालेली अतिक्रमण ही वाहतुकीस अडथळा निर्माण करतात आणि पर्यायाने अपघातास कारणीभूत ठरतात. त्यामुळे व्यापाऱ्यांनी स्वतःहून याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

## अंबाजोगाईत चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच ; चक्क एटीएम मशीन पळवली

अंबाजोगाई। प्रतिनिधी

महाराष्ट्र २४ तास अंबाजोगाई- मागील काही दिवसांपासून अंबाजोगाईत चोरट्यांचा धुमाकूळ सुरू आहे. दिवसाढवळ्या चोरीच्या घटना घडत असताना आता चोरट्यांनी आपला मोर्चा एटीएम मशीन कडे वळवला असून शनिवारी रात्री अंबाजोगाई शहरातील मोरेवाडी परिसरातील एटीएम मशीनचं पळवून नेल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. बीड जिल्ह्यात याअगोदर देखील जेसीबीच्या साहाय्याने एटीएम मशीन चोरून नेल्याची घटना घडली आहे. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ७ मे रोजी मोरेवाडी परिसरात असलेल्या कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात जाहीर सभा असल्याने शहरात पोलिसांचा मोठा फौजफाटा आहे. असं असतानाच चोरट्यांनी चक्क एटीएमवरच डल्ला मारला आहे.

अंबाजोगाई शहराजवळ असलेल्या मोरेवाडी येथील इंडियन पेट्रोल पंपा शेजारी 'इंडिया १' कंपनीचे खाजगी 'एटीएम' आहे. शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी या 'एटीएम' वर दरोडा घालत चक्क 'एटीएम' मशीनच पळवून नेले आहे. दरम्यान, या 'एटीएम' मध्ये संबंधित बँकेची किती कॅश होती ? ते अद्याप स्पष्ट झाले नाही. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून घटनेचा अधिक तपास सुरू आहे. दरम्यान या घटनेने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरात सातत्याने चोरीच्या घटना घडत असल्याने पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.




## जिवन ज्ञानदीप गुरूकूल मध्ये आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्रदान

धारूर।प्रतिनिधी

ऊस तोड मजुर,शेतकरी मुला,मुली करीता असणाऱ्या जिवन ज्ञानदीप गुरूकूल मध्ये सामाजीक कार्यकर्ते ज्ञानेश्वर शिंदे यांनी आपले आईचे स्मरणार्थ सुरू केलेला स्वर्गीय चंद्रकलाबाई विष्णूपंत शिंदे आदर्श विद्यार्थी पुरस्कार चि.वैभव भास्कर शेळकर या विद्यार्थीला देऊन तिंचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार प्रतीवर्षी देण्यात येतो, जीवन ज्ञानदीप गुरुकुल या निवासी शाळेत प्रा. रामकिसन चौरे यांच्या या गुरुकुल मध्ये चि. विराज ज्ञानेश्वर शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्त दरवर्षी शालेय साहित्य वाटप व खाऊची वाटप करत असतात याही वर्षी या शालेय साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाला.

दर वर्षी प्रमाणे स्वर्गीय चंद्रकलाबाई विष्णुपंत शिंदे यांच्या स्मरणार्थ गुरुकुल मधील आदर्श विद्यार्थी या संकल्पना राबवण्यात आली, यामध्ये प्रा. रामकिसन चौरे यांनी चि.वैभव भास्कर शेळकर या विद्यार्थिनीला हा पुरस्कार देण्याचे सुचवले, त्या मद्ये आर्थिक मानधन ,शालेय स्कूलबॅग , वही,पेन शालेय साहित्य असे या पुरस्काराचे स्वरूप होते, या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागीय पत्रकार अधिस्वीकृत समिती सदस्य अनिल महाजन तर प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष नितीन भैय्या शिनगारे,जलदुत प्रा.विजय शिनगारे ,दैनिक पुढारी चे अतुल भैय्या शिनगारे,व्ही.के.मोटर्स चे सुरज कोमटवार, मातोश्री कोचिंग क्लासेस चे अमोल गुळवे , कायाकल्प फाउंडेशनचे दिनेश कापसे,गौतम भैय्या चव्हाण,गणेश सावंत, हॉटेल सपना चे विशाल कोमटवार,मेडा डिपार्टमेंट पुणे कार्यालयाचे श्रीनिवास सोनटक्के, मेडा डिपार्टमेंट हिंगोली जिल्ह्याचे प्रभारी श्रीकांत सोनटक्के,संजय काळे, ज्ञानेश्वर शिंदे व मित्रपरिवार उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला,



प्रसंगी अमोल गुळवे यांनी विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात गुरुचे योग्य मार्गदर्शन घेऊन उंच भरारी घ्यावी व आपल्या क्षेत्रात उच्च पदस्थ व्हावे असे मार्गदर्शन केले, तसेच प्रसंगी नितीन भैय्या शिनगारे यांनी विद्यार्थ्यांनी प्राध्यापक चौरे सरांचा आदर्श घेत शिक्षणात उंच भरारी घ्या असे मार्गदर्शन केले. तर जलदुत प्रा.विजय शिनगारे यांनी अभ्यासात सातत्य ठेऊन यश संपादन करा असे म्हनाले. आज दुग्ध शर्करा योग म्हणजे जीवन ज्ञानदीप गुरुकुल चे प्रा. रामकिसन चौरे यांचा वाढदिवस मान्यवराच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वेळी विविध राजकीय, पत्रकरिता,व्यवसाय, शैक्षनिक क्षेत्रातील मान्यवर,विद्यार्थी उपस्थीत होते.

## विद्यार्थ्यांच्या निट परीक्षेसोबत पालकांची अग्निपरीक्षा: डॉ.ढवळे

बीड । प्रतिनिधी

आज दि.५ रविवार रोजी निट परीक्षा असल्याने परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी जावे लागते.काही विद्यार्थ्यांना अगदी जिल्ह्याच्या शेवटचे टोक असणा-या तालुक्यातील ठिकाणी दोन अडिच तासांचा प्रवास करून जावे लागते. आर्थिक सक्षमता असलेले पालक स्वतःच्या अथवा खाजगी वाहनांद्वारे परीक्षेच्या ठिकाणी पोहचतात.आर्थिक स्थिती मजबूत नसलेल्या पालकांनी विद्यार्थ्यांना एसटीने प्रवास करत परीक्षाकेंद्राच्या ठिकाणी अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

त्यातही असणारी परीक्षा केंद्रे शहरापासून ६-७ किलोमीटर शहराच्या बाहेर आहेत.त्याठिकाणी साधे पिण्याच्या पाण्याची सुद्धा सोय नाही.सकाळी ११ वाजता गेटच्या आतमध्ये सोडणा-या विद्यार्थ्यांचा पेपर दुपारी २ ते सायं ५ वाजुन २० मिनिटापर्यंत आहे.सकाळी ७-८ वाजता घरून थोडं फार खाऊन निघालेल्या विद्यार्थ्यांनी सकाळी ११ ते सायं साडे ५ तास उपाशीपोटी परीक्षा द्यायची. बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नाहकत्रास सहन करावा लागत असुन तालुक्यातील विद्यार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणी परीक्षा केंद्राची व्यवस्था केली तर निदान त्यांचे हाल होणार नाहीत. यावर्षी तिव्र उन्हाळा असल्याने उष्माघाताचा त्रास परीक्षार्थींना होऊ शकतो याची काळजी शिक्षण विभागाने घेणे गरजेचे आहे अशी प्रतिक्रिया पालकवर्गामधुन व्यक्त होत आहे.



## प्राणघातक हल्ला केल्याच्या आरोपातून सहा आरोपींची निर्दोष मुक्तता

अंबाजोगाई । प्रतिनिधी

खंजीर, कोयता, तलवारीच्या साह्याने प्राणघातक हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपातून सहा आरोपींची अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्या. घरत यांनी सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपींच्या बाजूने ॲड.कमलकिशोर पारीख यांनी युक्तिवाद केला.

सदरील घटना दहा वर्षांपूर्वी अंबाजोगाई शहरात घडली होती १० मार्च २०१४ रोजी अशाकुल्ला दर्गा येथे लायक अली शाहा, मंजूर अली शाहा, हमीद पठाण, उबेद शेख, सलीम शेख आणि हैदरअली शाहा या सहा जणांनी मिळून खंजीर, कोयता, तलवार, कत्तीच्या साह्याने फिर्यादीवर हल्ला करून त्यास गंभीर जखमी केले. या प्रकरणी त्या सहा जणांवर कलम ३०७, १४७, १४८, १४९ कालाम्न्वाये गुन्हा नोंद झाला. सदर प्रकरणात सरकारी वकीलांकडून एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. विशेष म्हणजे या प्रकरणामुळे अंबाजोगाई रविवार पेठ येथे एक खून झाला आहे. त्यामुळे अंबाजोगाई व परळीकरांचे संपूर्ण लक्ष या प्रकरणाकडे लागून होते.

आरोपींच्या वतीने ॲड.कमलकिशोर पारीख यांनी जोदार युक्तिवाद केला. आरोपीच्या वकिलांच्या भक्कम पुरावा आणि युक्तिवाद लक्षात घेऊन न्या. घरत यांनी लायक अली शाहा, मंजूर अली शाहा, हमीद पठाण, उबेद शेख, सलीम शेख आणि हैदरअली शाहा या सहा आरोपींची निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणात ॲड.कमलकिशोर पारीख यांना ॲड.अक्षय कामळे व ॲड.सुरेखा शिंदे यांनी सहकार्य केले.

## मी मतदान करणार, जागतिक व्यंगचित्रकार दिनानिमित्त सुहास पालीमकर यांचा जनजागृती स्तुत्य उपक्रम

बीड । प्रतिनिधी

बीड येथील आयुमंगलम निवासी मूकबधिर विद्यालयातील कलाशिक्षक तथा गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स, वेब बुक वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये बीड जिल्ह्याचे नाव उंचावणारे विश्वविक्रमी व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांनी रविवार दि. पाच मे २०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळील आठवडी बाजार तळ, यशवंत उद्यान परिसरात जागतिक किर्तीप्राप्त व्यंगचित्रकार सुहास पालिमकर सरांच्या स्वखर्चातून मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. भारताचा सुजाण नागरिक म्हणून मी मतदान करणार आणि इतरांनाही मतदान करण्याची जागृती करण्याचे आवाहन करणार व दिव्यांग मतदार जनजागृतीसाठी रेखाटलेल्या व्यंगचित्राचे प्रदर्शन स्वखर्चाने आयोजित केले होते.

या कार्यक्रमानिमित्त पालीमकरांची कार्यतत्परता व समाजाप्रती असणारी योगदानाची सिद्धता सामाजिक कार्यातून त्यांनी दाखवून दिली. पालीमकरांची काम करण्याची जिद्द व सातत्य या गोष्टी नोंद घेण्यायोग्य आहेत. रविवार दिनांक पाच मे २०२४ रोजी आयोजित केलेल्या व्यंगचित्र प्रदर्शनात श्री. नागेश मोरे, देशमाने, नाटकर, गोपी परदेशी, गायकवाड, बजगुडे, राऊत, खोटे, बडगे, ज्ञानेश्वर अंधारे, रफिक पठाण, बाळासाहेब घुमरे, भास्कर पिंपरीकर, ॅड. समीर पाटोदकर, देवीचंद काशिद, मनोज पतंगे, लोंढे, ढेपे, ज्योती शिंदे आदींसह अनेकांनी लाभ घेतला व कलेचा आनंद व्यक्त करून मतदान तर करणारच अशी शपथ घेतली.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना सुहास पालीमकर म्हणाले की मी आजपर्यंत व्यंगचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून बेटी बचाव बेटी पढाव व्यसनमुक्त अभियान हुंडा मुक्ती, बालकामगार, न्याय आपल्या दारी यासह विविध सामाजिक उपक्रमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न स्वखर्चातून केला असून मतदान जनजागृती व दिव्यांग मतदाराना मतदान करण्याचे आवाहन या सामाजिक बांधिलकीतून करत असल्याचे ते याप्रसंगी म्हणाले. नागेश मोरे यावेळी म्हणाले की सुहास पालीमकर यांचा मतदार जनजागृती हा सामाजिक उपक्रम अतिशय स्तुत्य असून भारताच्या उज्वल भवितव्यासाठी प्रत्येक मतदारांनी मतदान केलेच पाहिजे हे जनजागृती अभियान कौतुकास्पद आहे हा सामाजिक उपक्रम ते स्वखर्चातून करीत असून हे उल्लेखनीय बाब असल्याचे ते यावेळी म्हणाले.

फळविक्रेत्या ज्योती शिंदे यावेळी म्हणाल्या की व्यंगचित्राचे येथे आयोजित केलेले प्रदर्शन पाहून मनाला आनंद झाला. पालीम्काराचा हा छोटा उपक्रम आमच्यासारख्या महिलांसाठी प्रेरणादायी असून मी नक्कीच मतदान करणार असल्याचे त्या यावेळी म्हणाले. रफीक पठाण याप्रसंगी म्हणाले की कामाच्या व्यापातून मतदान करण्याचे विसरून जाते किंवा वेळच मिळत नाही आणि ज्यावेळी आम्हाला वेळ मिळतो त्यावेळी मतदानाची वेळ संपलेली असते पण यावेळी असे होऊ न देता मी मतदान करूनच कामाला जाणार असल्याचे त्यांनी सांगून माझ्यासारख्या अनेक छोट्या मोठ्या व्यवसायिकांनी वेळात वेळ काढून मतदान करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले तसेच व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांचे व्यंगचित्रे मनाला भावणारी असतात कमी शब्दांमध्ये अनेक अर्थाचे भाव त्यांच्या व्यंगचित्रातून दिसतात हे त्यांचे आजचे व्यंगचित्र प्रदर्शन अनेकांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहन देणारे असल्याचे ते यावेळी म्हणाले. रविवारी संपन्न झालेल्या व्यंगचित्र प्रदर्शनात सकाळपासून अनेक महिला, फळ विक्रेत्या महिला, छोटे-मोठे व्यापारी, ग्रामीण भागातून आलेल्या महिला, पुरुष ग्रामस्थ यासह परिसरातील नागरिकांनी भेटी देऊन समाधान व्यक्त केले तसेच मी मतदान करणार असल्याचे सांगितले व पालींकराच्या या जनजागृती उपक्रमाचे कौतुक केले.



# मराठा समाज विकासासाठी पंकजाताईंच्या सोबत - आ. आजबे

## ताईंनी जो विकास केला तो कोणीही केला नाही, त्याची परतफेड त्यांना संसदेत पाठवून करा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पंकजाताई मुंडे यांनी कायम जिल्ह्याचा विकास डोळ्यासमोर ठेवून काम केले. त्यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी विकास हेच ध्येय समोर ठेवून जिल्ह्यात काम केले.स्वपक्षाच्या कार्यकर्त्यांसह इतर विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांचाही सन्मान केला. विकास कामात कधीही राजकारण आड येवू दिले नाही, त्यांनी समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेतले आहे. मुंडे परिवार आणि मराठा समाजाचे नाते कायम स्नेहाचे आणि सन्मानाचे राहिले. म्हणूनच या देशाच्या महत्वाच्या निवडणूकीत जिल्ह्यातील मराठा समाज बांधव जिल्ह्याच्या विकासासाठी भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांच्यासोबत असल्याचे प्रतिपादन आष्टी-पाटोदा-शिरुरकासार मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी केले.





भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांनी आज पाटोदा तालुक्यातील कुसळंब, पारगाव घुमरा, पारनेर, गवळवाडी या भागात जावून प्रचार दौरा पुर्ण करत मतदारांशी संवाद साधला. या दौर्यात त्यांच्यासमवेत महायुतीचे नेते आ.बाळासाहेब आजबे यांच्यासह जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी आ.आजबे काका बोलत होते. ते म्हणाले, पंकजाताईंनी बीड जिल्ह्यात यापूर्वी जो विकास केला, ती कामे जनतेला अजूनही फायद्याची ठरत आहेत. जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ते मंजूर केले. पिकविमा असेल अतिवृष्टीचे अनुदान असेल, शेतकर्यांना कोणतेही अनुदान देण्याचे काम ताईंच्या माध्यमातून झाले आहे. अनेक मोठी कामे पंकजाताईंच्या नेतृत्वात यापूर्वी मार्गी लागली आहेत. पंकजाताईंनी जो विकास केला तो कोणीही केला नाही, त्याची परतफेड त्यांना संसदेत पाठवून करा. भविष्यातील बीड जिल्ह्यातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी पंकजाताईच सक्षम नेतृत्व आहेत, याची जाण ठेवून आपण सर्वांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी पंकजाताईंना या भागातील प्रचंड मताधिक्य देवून विजयी करावे असे आवाहन याप्रसंगी आ.बाळासाहेब आजबे यांनी केले.

# यावेळेस बीडमध्ये खासदार आणि दिल्लीत सरकार दोन्ही सेक्युलर विचारांचे असेल

### आ.संदीप क्षीरसागर : बीड शहरात लोकसभा प्रचारार्थ कॉर्नर सभा

**बीड । प्रतिनिधी**

यावेळेस बीड लोकसभा मतदारसंघाचा खासदार आणि दिल्लीचे केंद्र सरकार या दोन्ही ठिकाणी सेक्युलर विचारांचे असतील. जे सर्व जाती धर्मांना, समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन चालतील. त्यासाठी आपल्याला महाविकास आघाडीच्या उमेदवाराला म्हणजेच बजरंग सोनवणे यांना मतदानरूपी आशिर्वाद द्यावा लागेल आणि आपण तो निश्चितच द्याल असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

शनिवार (दि.४) रोजी बीड शहरात नीलकमल हॉटेल येथे बुध्दीजीवी



सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांची आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. तसेच शहरातील शहेनशाह नगर भागात कॉर्नर सभा झाली. दरम्यान हिंदू-मुस्लीम वाद भडकवून आपल्या राजकीय पोळया भाजून घेतात घेणार्या विचारसरणीचा आता शेवट असणार आहे. जाती-जातींमध्ये भांडण लावून घाणेरडे राजकारण करण्याची संधी आता जनशक्ती देणार नाही . यावेळेस बीडमध्ये खासदार आणि दिल्लीमध्ये सरकार दोन्ही सेक्युलर विचारांचेच असेल असा आशावाद आणि विश्वास यावेळी आ.क्षीरसागर यांनी व्यक्त केला. याप्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आश्वासक नेतृत्व म्हणून पंकजाताई मुंडे यांना सर्व स्तरातून वाढता पाठींबा

**बीड । प्रतिनिधी**

भाजपा आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ काल ( शनिवार ) खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील टकारी समाज, मातंग समाज, कैकाडी समाज यांच्या बैठकी घेतल्या. सर्वांच्या सोबतीने बीड जिल्ह्याच्या विकासाला नवी उंची देणाऱ्या सर्वसमावेशक उमेदवार म्हणून सर्वांनी पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबा दिला. दरम्यान बीड लोकसभा क्षेत्रात लक्षनीय मतदार संख्या असलेल्या या तीन समाज घटकांनी पाठींबा दिल्यामुळे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचे मताधिक्य वाढले आहे.

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारानिमित्त खा. प्रितमताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील विविध समाज घटकांना भेटून त्यांच्याशी संवाद साधला. राज्याच्या ग्रामविकास मंत्री असताना पंकजाताई



मुंडे यांनी सर्वसमाजांना सोबत ठेवून बीड जिल्ह्यात विकासाचा पाया रचला, त्यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वामुळे बीड जिल्ह्यात सामाजिक सलोखा अबाधित आहे. जिल्ह्याचे सामाजिक सौहार्दय टिकवून ठेवण्यासाठी सर्वांनी पाठींबा दिल्याबद्दल आभार मानून सर्व घटकांच्या विकासात यापुढेही सातत्य ठेवणार असल्याचे खा. प्रितममुंडे म्हणाल्या.

दरम्यान बीड शहरात खा. प्रितमताई मुंडे यांच्या आणि अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष अमित गोरखे यांच्या प्रमुख उपस्थितीत मातंग समाजाचा मेळावा संपन्न झाला. बीड जिल्ह्यातील सर्व मातंग समाज एकजुटीने पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी उभा राहणार असल्याची ग्वाही याप्रसंगी कार्यक्रमाचे आयोजकांनी दिली. तर बीड तालुक्यातील शिरापूर येथे टकारी समाजाच्या विजय संकल्प मेळाव्यात टकारी समाज, कैकाडी समाज, दंडम अण्णा मित्र मंडळाने पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबा दिला.

# पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ वडवणी तालुक्यामध्ये केशवदादांचा झंझावात दौरा

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील खंडोबाचीवाडी, टोकेवाडी, काऱ्हाळवाडी या डोंगरपट्ट्यातील गावांमध्ये रविवार दि.५ मे २०२४ रोजी बीड लोकसभा मतदार संघाच्या भारतीय जनता पार्टी व महायुतीच्या अधिकृत उमेदवार मा.पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या प्रचारार्थ मा.आ.केशवदादा आंधळे यांच्या दौऱ्याला मतदारांचा प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला.

मा.पंकजाताई मुंडे यांना बीड लोकसभा मतदारसंघातून प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी तहानभूक हरवून,जिवाचे राण करून मा.आ.केशवदादा आंधळे वडवणी तालुक्यातील सर्व गावे पिंजून काढण्याचं काम करतायेत खंडोबाचीवाडी,टोकेवाडी,काऱ्हाळवाडी या गावांमध्ये पंकजाताईंच्या प्रचारार्थ दौऱ्या दरम्यान ते म्हणाले की,बीड



जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना पंकजाताईंनी राष्ट्रीय महामार्गासह, राज्यमार्ग,शासनाच्या वेगवेगळ्या योजना व पिकविमासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी त्यांनी मंजूर करून आणला,बीड जिल्ह्याच्या विकासाच व्हिजन असणाऱ्या नेत्या आहेत, सर्व जाती धर्माचे हीत पाहणाऱ्या आहेत, शेतकऱ्यांचे,ऊसतोड मजुरांचे, सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्याचं काम त्या करतील पंकजाताई फक्त खासदार नाही तर त्या मंत्री होणार आहेत बीड जिल्ह्याच्या विकासासाठी येणाऱ्या १३ तारखेला मतदान केंद्रावर जाऊन अनुक्रमांक एक असलेल्या पंकजा गोपीनाथराव मुंडे यांच्या कमळ चिन्हासमोरील बटन दाबून पंकजाताईला प्रचंड बहुमताने विजयी करून दिल्लीला पाठवा असे त्यांनी मतदारांना आवाहन केले. या नियोजित दौऱ्या दरम्यान वडवणी शहराचे उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे,सोमनाथ भाऊ बडे, संजय भाऊ आंधळे ,बाबरी शेठ मुंडे,अनिलदादा चोले, डॉ.खोटे,डॉ. डोंगरे,महादेव बप्पा रेडे,महादेव सावंत यांच्यासह गावातील व तालुक्यातील भारतीय जनता पार्टी,शिवसेना,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष,मनसे व घटक पक्षाचे मोठ्या संख्येने कार्यकर्ते या दौऱ्या दरम्यान उपस्थित होते या दौऱ्याला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला.

# अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आंतरावली सराटीत

**जालना । प्रतिनिधी**

राज्यातील सर्वाधिक चुरशीची बनलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघातील नणंद (सुप्रिया सुळे)- भावजय (सुनेत्रा पवार) मधील निवडणूकीकडे सध्या महाराष्ट्रासह देशभरातील राजकिय वर्तुळातील सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. या लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने पहिल्यांदाच पवार कुटुंबातील शरद पवार विरूध्द अजित पवार असा सामना रंगला आहे. या लढतीच्या निमित्ताने अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार हे आंतरावली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

बारामती हा शरद पवार आणि कुटुंबियांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. तसेच या शरद पवार आणि अजित पवार यांच्यात राजकियदृष्ट्या प्रचंड समंजसपणा असल्याने या काका-पुतण्यामध्ये कधी गैरसमज झाल्याचे ऐकिवात नाही. मात्र या काका-पुतण्यामध्ये फूट पाडण्यात भाजपा कमालीची ठरली. त्यानंतर आलेल्या या पहिल्याच लोकसभा निवडणूकीत शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उभ्या राहिल्या आहेत. सुप्रिया सुळे यांना पाठिंबा देण्यासाठी कुटुंबियांसह आणि राजकिय मदत करण्यासाठी राज्यातील अनेक भागातील अनेक लहान-मोठे राजकिय पक्ष आणि सामाजिक संघटना स्वतःहून पुढे आल्या. तर दुसऱ्याबाजूला अजित पवार यांना त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना निवडूण आणण्यासाठी त्यांच्या मर्जीतील कार्यकर्त्यांच्या मार्फत विविध जात समुदायाच्या लोकांना आपल्या बाजूला वळविण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार एकाबाजूला त्यांच्या आई सुनेत्रा पवार यांच्या विजयासाठी वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढवित आहेत. तर दुसऱ्याबाजूला जय पवार हे पहिल्यांदाच मराठा आरक्षणाचा लढा पुकारणारे मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीला आंतरावली सराटी येथे जात भेट घेतली. या भेटीत काय चर्चा झाली याचे सविस्तर वृत्त पुढे आले नसले तरी मराठा आरक्षणाच्या लढ्या दरम्यान इंदापूर आणि दौड येथील सभेत जो प्रतिसाद मनोज जरांगे पाटील यांच्या सभेला मिळाला तो पाहता ही भेट निवडणूकीच्या निमित्ताने होती की कशासाठी होती याचे गुपित नक्कीच राहिलेले नाही.

# आयान पठाण या चिमुकल्याने खाऊ साठी गोळा केलेले पैसे दिले बाप्पांना

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार श्री बजरंग बप्पा सोनवणे आष्टी तालुक्यातील गावोगावी प्रचारार्थ मतदारांच्या गाठी भेटी घेतांना तागडखेल येथील आयान शौकत पठाण या १३ वर्षाच्या मुलाने खाऊ साठी गोळा झालेल्या पैशातून सायकल घ्यायची होती परंतु बजरंग बप्पा सोनवणे यांनी निवडणूक यावं यासाठी आपल्या जवळील गोळा केलेले पैसे प्रत्येक्ष बप्पा यांना देऊन टाकले.व तुम्हीच खासदार होणार आहे अशी इच्छा व्यक्त केली.या कल्पनेमुळे बप्पा प्रती असलेला जिव्हाळा सातवीत शिकणारा आयान पठाण कडून दिसून आल्याने आयान चे गावभर कौतुक होत आहे.यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर,आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे अध्यक्ष रामभाऊ खाडे,सुनील नाथ,अमोल राजे तरटे, अल्पसंख्याक संघटनेचे अध्यक्ष शौकत अन्वर पठाण,बाळू गव्हाणे,शरद गव्हाणे,समीर पठाण,संतोष गव्हाणे,दिनकर जाधव,राजू अकोलकर,आदी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना निवडुण द्या -ज्ञानेश्वर सरवदे

**माजलगाव । प्रतिनिधी**

भाजपाच्या महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या वतीने आठवडी बाजारात प्राचार रॅलीचे आयोजन दि ०५ मे रविवार रोजी सकाळी ९:०० ते ११:०० दरम्यान आयोजन करण्यात आले होते,प्रचार रॅली दरम्यान भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे यांनी प्रचारा दरम्यान बीड जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना मतदारांनी भरघोस मतांनी निवडुण द्या असे आवाहन केले.तसेच या प्रचार रॅली मध्ये माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी सहभागी होत महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा प्रचार केला.

सध्या जिल्ह्यात लोकसभा प्रचाराची रणधुमाळी सुरु असुन माजलगाव मध्ये भाजपाच्या माहायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे वतीने आठवडी बाजारात प्रचार रॅली चे आयोजन दि



०५ मे रविवार रोजी सकाळी ९:०० ते ११:०० या दरम्यान करण्यात आले.या प्रचार रॅलीत शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते केसापुरी वसाहत येथील सादोळा चौक दरम्यान आयोजन करण्यात आले होते तसेच या आठवडी बाजारात तालुक्यातील ३० ते ४० गावातील नागरीकांचा सहभाग असतो.या रॅलीत भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे यांनी आठवडी बाजारातील नागरीकांना प्रचार पत्रके वाटप करताना बीड जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना निवडून देण्याचे आवहान केले.

या प्रचार रॅलीत भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे बीड जिल्हा सरचिटणीस अविनाश कांडूरे, सरपंच दत्ता आढाव, शंकर गावडे,दत्ता आबूज,भगीरथ शेजुळ,नाना सोळंके इश्वर खुरपे,तात्या पांचाळ,सचिन गातवे,सोमनाथ आबुज यांचा सह्रभाग होता.

**माजी मंत्री बबनराव लोणीकर यांचा प्रचार रॅलीत सहभाग**

भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या वतीने महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ काढलेल्या प्रचार रॅलीत माजी मंत्री तथा लोकसभा निवडणूक निरीक्षक बबनराव लोणीकर हे माजलगाव शहरातील बैठकीसाठी येत असताना केसापुरी वसाहत येथील सादोळा चौकातुन माजलगाव कडे येत असताना प्रचार रॅली दिसल्याने त्यांनी गाडीच्या खाली उतरुन स्व:ता प्रचार रॅलीत सहभागी होत बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा प्रचार केला.

# येडेश्वरीच्या माध्यमातून ऊसाला सर्वाधिक भाव देणारे बजरंग बप्पाच खरे शेतकरी पुत्र


## सोनवणेंना वाढता पाठिंबा म्हणजे शेतकरी, सामान्य माणसाने निवडणूक हाती घेतल्याचे धोतक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात राजकीय नेत्यांचे कारखाने आहेत. मात्र या कारखान्यांकडून शेतकर्यांच्या ऊसाला योग्य भाव देण्यास वारवांर टाळाटाळ केली जाते. स्थानिक शेतकर्यांचा ऊस घेण्याऐवजी बाहेर राज्यातून ऊसाची आवक जिल्ह्यातील कारखाने करत असताना बीड लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी २०११ मध्ये येडेश्वरी साखर कारखान्याचे भुमिपुजन केले आणि बघता बघता कारखाना उभा राहिला. शेतकर्यांच्या प्रश्नांची कायम जाणिव असणार्या बप्पांनी आपला कारखाना शेतकर्यांच्या पाठिशी उभा केला. जिल्ह्यातील कारखान्यांकडून ऊसाला योग्य भाव मिळत नसताना बजरंग सोनवणे यांनी दुष्काळी परिस्थितीतही जिल्ह्यातील ऊसाला सर्वाधिक भाव दिला. यामुळे बजरंग सोनवणे हेच खरे शेतकरीपुत्र असल्याचे दिसून येते.

एकीकडे उन्हाच्या तीव्रतेने वातावरण उष्ण होत आहे तर दुसरकीडे बीड लोकसभा निवडणुकीचे वातावरणही ढवळून निघत पान ३ वर

### शेतकरी, सामान्य माणसाने हाती घेतली निवडणूक



२०१९ च्या लोकसभा निवडणुकीतही शरद पवारांनी बजरंग सोनवणे यांना उमेदवारी दिली होती. पवार यांनी दाखवलेला विश्वास बजरंग सोनवणे यांनी सार्थ ठरवत तब्बल पाच लाखापेक्षा अधिकची मते घेवून काट्याची टक्कर दिली. २०१९ मध्ये बप्पांचा पराभव झाला असला तरी सामान्य माणसाला उमेदवारी दिल्यानंतर जनता कशापद्धतीने साथ देते हे अवघ्या राज्याने पाहिले. आताही शेतकरीपुत्र विरुध्द धनशक्ती निवडणूक होत आहे. प्रस्थापितांच्या विरोधात पुन्हा एकदा शरद पवारांनी शेतकरी पुत्र असलेला, जमिनीवरच्या सामान्य कार्यकर्त्याला संधी दिल्याचे मतदार बोलू लागला. बजरंग सोनवणे यांना जिल्हाभरात मिळत असलेला प्रतिसाद पाहून यंदाची निवडणूक आता शेतकरी आणि सामन्य माणसाने हाती घेतल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# खासदारांनी केवळ 'सेल्फी' काढण्याचे काम केले : अजित पवारांची सुप्रिया सुळेंवर टीका

**इंदापूर । प्रतिनिधी**

मागील दहा वर्षांमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदारांनी विकासाचे कोणतेही काम केलेले नसून, केवळ मसेल्फीफ काढण्याचे काम केले आहे, असा टोला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या भगिनी तसेच महाविकास आघाडीच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना नाव न घेता लगावला. इंदापूर तालुक्याच्या शेळगाव येथे महायुतीच्या बारामती मतदारसंघाच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ सभा पार पडली, त्यासभेत पवार बोलत



होते. अजित पवार म्हणाले, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार दत्तात्रय भरणे व मी राज्याच्या व इंदापूर तालुक्याच्या विकासासाठी एकत्र आलो आहे. यापुढे इंदापूर तालुक्यातील पाणी प्रश्नाबरोबर इतर विकासकामे केल्याशिवाय गप्प बसणार नाही.

हर्षवर्धन पाटील म्हणाले, ४ जूनचा निकाल ऐतिहासिक असेल आणि बारामतीपेक्षा जास्त मताधिक्य इंदापूर तालुक्यातून देऊ. इंदापूर तालुक्याचा आजवर झालेला विकास हा फक्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळेच झाला आहे. या पुढील विकासासाठी सुनेत्रा पवार यांना मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन आमदार दत्तात्रय भरणे व मोहोळचे आमदार यशवंत माने यांनी केले. छत्रपती साखर कारखान्याचे संचालक अॅड. लक्ष्मणराव शिंगाडे, आमदार रमेश पाटील, प्रताप पाटील, माजी सभापती प्रवीण माने, अंकिता पाटील, राजवर्धन पाटील, लालासाहेब पवार, विठ्ठल जाधव, सरपंच ऊर्मिला शिंगाडे, अॅड. शरद जामदार, हनुमंत कोकाटे, श्रीमंत ढोले, वसंत मोहोळकर, अनिल बागल, शशिकांत तरंगे, मोहन दुधाळ, युवराज म्हस्के, दत्तात्रय फडतरे, साधना केकान, गजानन वाकसे, नारायण खराडे, विलास भांगे, रसूल शिंदे, प्रताप चवरे, वैभव शिंगाडे, राहुल जाधव, महेश खराडे, बापुराव दुधाळ, छगन शिंगाडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिन सपकळ यांनी आभार मानले.

# सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांकडून बाईक रॅलीद्वारे मतदान जागृती

पुणे,दि.५: येत्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत सेवानिवृत्त पोलीस वेल्फेअर असोसिएशन आणि मित्र संघटनेच्यावतीने सेवानिवृत्त पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून बाईक रॅलीद्वारे मतदान जागृती करण्यात आली.

पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, सेवानिवृत्त पोलीस वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भानुप्रताप बर्गे, उपायुक्त राजीव नंदकर आदी यावेळी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. भोसले यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेच्या प्रांगणातून रॅलीची सुरुवात झाली. यावेळी मतदानाची शपथ घेण्यात आली. मतदानाच्या दिवशी सुट्टी साजरी न करता प्रत्येकाने राष्ट्रीय कर्तव्य म्हणून मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन डॉ. भोसले यांनी यावेळी केले.

सीमेवरील सैनिक २४ तास ३६५ दिवस आपल्या व देशाच्या संरक्षणासाठी अत्यंत उच्च तापमानामध्ये तसेच थंडी, पावसामध्ये तैनात




असतो व आपले कर्तव्य बजावत असतो त्याचप्रमाणे आपणदेखील मतदानासाठी थोडा वेळ काढून मतदानाचे कर्तव्य आणि हक्क बजवावा असे आवाहन श्री.बर्गे यांनी यावेळी केले.

रॅलीमध्ये सुमारे ५०० दुचाकी स्वार सहभागी झाले. घोषणा देत आणि मतदारांना आवाहन करत शनिवार वाडा, लक्ष्मी रोड, अलका टॉकीज, सेनादत्त पोलीस चौकी, नळ स्टॉप, एस एन डी टी कॉलेज, लॉ कॉलेज रोड, भांडारकर रोड, कृषी महाविद्यालय, संचेती हॉस्पिटल, आरटीओमार्गे आंबेडकर चौकात रॅलीचा समारोप झाला.

# लेकीसाठी प्रतिभा पवार प्रथमच निवडणुकीच्या मैदानात

बारामती : : महाविकास आघाडीतर्फे शुक्रवारी (दि. ३) बारामतीत आयोजित महिला मेळाव्यात मविआच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी त्यांच्या आई प्रतिभा पवार यांनी हजेरी लावली. प्रतिभा पवार ह्या आजवर फक्त सांगता सभेतच उपस्थितांमध्ये बारामतीकरांना दिसायच्या. शुक्रवारी मात्र त्यांनी लेकीसाठी मेळाव्याच्या व्यासपीठावरून उपस्थितांना अभिवादन केले.



बारामतीच्या मिशन बंगल्याच्या मैदानावर आजवर पवार कुटुंबीय प्रचाराची सांगता सभा घेत आले आहे. यापूर्वी पक्ष एकसंध असताना झालेल्या प्रत्येक सभेला प्रतिभा पवार यांच्यासह कुटुंबातील सर्व महिला उपस्थित राहत होत्या. परंतु, त्या उपस्थितांमध्ये बसायच्या. शुक्रवारच्या मेळाव्यात प्रतिभा पवार, सुनंदा पवार, शर्मिला पवार, शुभांगी पवार, कुंती पवार, सई पवार, रोहित पवार, रेवती सुळे यांच्यासह विद्या चव्हाण, निर्मला सावंत, सक्षणा सलगर, पौणिमा तावरे, वनिता बनकर, विकास लवांडे, शिवरत्न शेटे यांची उपस्थिती होती. प्रतिभा पवार यांचा महिलांकडून सन्मान करण्यात आला. त्यांनी भाषण केले नाही. परंतु, उपस्थितांना हात जोडून अभिवादन केले.

अजित पवार यांच्या सख्ख्या भावजय शर्मिला पवार यांनी त्यांच्या भाषणात, ममी नणदेची जागा कधीही घेणार नाही. आम्ही बाहेरच्याच आहोत. मूळ पवारांचा जो डीएनए आहे, तो सुप्रिया सुळे यांच्यातच आहे. त्यामुळे यासंबंधी जे वाक्य वापरले गेले, ते चुकीचे नाही, असे स्पष्ट केले. आता त्यांनी व्यक्त केलेल्या मतावर अजित पवार काय उत्तर देतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.मी गेल्या आठ महिन्यांपासून गप्प आहे. म्हणजे आम्ही काहीच उत्तर देऊ शकत नाही, हा गैरसमज ठेवू नये. रोहितच्या आईबद्दल एकवेळ बोलला, गप्प बसलो. माझ्यावर, माझ्या वडिलांवर बोलला, गप्प बसलो. पण, माझ्या आईबद्दल बोलाल, तर करारा जवाब देईन, असा इशारा या वेळी सुप्रिया सुळे यांनी दिला. त्या म्हणाल्या की, नाती जपायची असतात. ती तुटायला काहीवेळ पुरेसा असतो. रोहितच्या आईबद्दल बोललात, ठीक आहे, माझ्या मनगटात जी ताकद आहे, ती आजी शारदाबाईंच्या बांगड्यांची आहे, हे विसरू नका. विकास काही कोणी किंवा मी स्वतःच्या खिशातून करीत नाही. त्यामुळे मी विकास केला नाही, आम्ही मिळून विकास केल्याचा टोला त्यांनी लगावला.

# वारजेमधील रुग्णालयातील सोनोग्राफी मशिन सील

पुणे । प्रतिनिधी

वारजे माळवाडी येथील एका खासगी रुग्णालयातील सोनोग्राफी मशिन महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सील करण्यात आली. आरोग्य उपप्रमुख डॉ. कल्पना बळीवंत यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने ही कारवाई केली. संबंधित रुग्णालयाला नोटीस बजावण्यात आली आहे. आरोग्य विभागाच्या भरारी वैद्यकीय पथकातर्फे धडक मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत तपासणी केली असता संबंधित रुग्णालयाने मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यांमध्ये ५३ 'फॉर्म एफ'वर रुग्णांच्या सह्या घेतल्या नसल्याने आढळून आले. सध्या खासगी रुग्णालयाला मशीन सील करून १५ दिवसांची नोटीस देण्यात आली. या कालावधीत त्रुटी दूर न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे गर्भधारणापूर्व तपासणी तंत्र (पीसीपीएनडीटी) कायद्यांतर्गत शहरातील सोनाग्राफी सेंटर, गर्भपात केंद्रांची काटेकोर तपासणी करण्यात येते. गर्भपात केंद्राची तपासणी करताना सर्व नोंदी बारकाईने तपासल्या जातात. त्रुटी आढळल्यास शहानिशा केली जाते. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी पोलिसांकडे तक्रार नोंदवू शकतात. सरकारमान्य आणि नोंदणीकृत सोनोग्राफी सेंटरची दर तीन महिन्यांनी महापालिकेच्या वैद्यकीय पथकाकडून तपासणी केली जाते. त्यासाठी १५-२० जणांची टीम कार्यरत आहे. पाहणीमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित केंद्रांना नोटीस पाठवली जाते. नोटिशीला उत्तर न आल्यास किंवा त्रुटी दूर न केल्यास केंद्र सील केले जाते. गर्भलिंग निदान होऊ नये आणि होत असल्यास त्यावर कारवाई व्हावी, यासाठीही यंत्रणा कार्यरत असल्याचे आरोग्य विभागातील अधिकार्यांनी सांगितले. पीसीपीएनडीटी कायद्यानुसार, रुग्णांच्या नोंदी ठेवण्यासाठी फॉर्म एफ भरून घेणे अनिवार्य आहे. या फॉर्ममध्ये रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक, रुग्णाची मूलभूत माहिती, आधीची अपत्ये - किती मुले, किती मुली, उपचार करणा-या डॉक्टरांची माहिती, उपचारांची आणि तपासण्यांची माहिती, वैद्यकीय पार्श्वभूमी आदींची इत्थंभूत माहिती भरून रुग्णांची सही घ्यावी लागते. वारजेमधील खासगी रुग्णालयाने तब्बल ५३ अर्जांवर रुग्णांच्या सह्या घेतल्या नसल्याचे आढळून आले.

# बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याच्या अध्यक्षपदी पुण्याचे अॅडव्हकेट राजेंद्र उमाप बिनविरोध

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या अध्यक्षपदी पुणे येथील अॅड. राजेंद्र उमाप यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांना उपाध्यक्ष पदी काम करण्याची दोनदा संधी मिळाली आहे. सध्याही ते उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांना आता अध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. या बार कौन्सिलमध्ये महाराष्ट्र आणि गोवा ही दोन राज्ये आणि दादर नगर हवेली आणि दिव दमण या दोन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे.



दोन लाखाहून अधिक वकील या संघटनेचे सभासद आहेत. त्यांनी यापूर्वी पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. ते सध्या आळंदी देवाची येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीचे प्रमुख विश्वस्त आहेत. ते चिंचवड देवस्थानचे ट्रस्टचेही विश्वस्त आहेत. ज्यामध्ये मोरगाव, सिध्दटेक आणि थेऊर अष्टविनायकचा समावेश आहे. याशिवाय विविध पदे ते भूषवित आहेत.


वकिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार आहे. वकिलांची सुरक्षितता, आरोग्य विषयक आणि इतर प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार आहे. बार कौन्सिलचे डिजिटलायझेशन करण्यावर भर असणार आहे. प्रत्येक बार असोसिएशनला बार कौन्सिलच्या योजना लवकरात लवकर माहित होण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. वकील अकादमीसाठी जागा मिळाली आहे. त्यासाठी आवश्यक परवानग्या मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. बार कौन्सिलच्या वतीने २०२० पासून झालेल्या नवीन वकिलांचे मोफत मेडिक्लेम आणि अपघात क्लेम काढण्यात येत आहेत.

# 'एमआयटी-एडीटी'ला 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंग

**पुणे । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना कायमच गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्यासाठी कटीबद्ध असणाऱ्या एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. एमआयटी एडीटी विद्यापीठाने नुकतीच आपली शैक्षणिक कटिबद्दता सिद्ध करताना क्यूएस जागतिक विद्यापीठ क्रमवारी-२०२४(वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग) च्या प्रतिष्ठित कला आणि डिझाइन श्रेणीमध्ये १५०-२०० अशा प्रभावी रँक बँडसह स्थान मिळवले आहे.

या यशामुळे एमआयटी एडीटी विद्यापीठाने जागतिक स्तरावर उच्च शिक्षणातील अग्रगण्य संस्था म्हणून आपली प्रतिष्ठा मजबूत केली आहे. क्युएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग हे शैक्षणिक गुणवत्तेचे आणि संस्थात्मक कार्यक्षमतेचे महत्त्वपूर्ण मापदंड म्हणून ओळखले जाते, जे शिक्षणातील उत्कृष्टतेचे



मूल्यांकन आणि प्रोत्साहन देण्यासाठी महत्वपूर्ण काम करते.

एमआयटी एडीटी विद्यापीठ संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष तथा कुलगुरू प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि कार्यकारी संचालिका प्रा.डॉ.सुनिता कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी या शाखांत जागतिक दर्जाचे नाविण्यपूर्ण शिक्षण पुरवत आहे. त्यामुळे विद्यापीठाला या रँकिंगमध्ये स्थान मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या पालकांसह राज्यभरातून एमआयटी एडीटी विद्यापीठावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठ डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे आणि डॉ. अनंत चक्रदेव हे तीन प्र.कुलगुरू तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कष्टांमुळे यशाची विविध शिखरे पादक्रांत करत आहे. त्यात विद्यापीठाला क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग मध्ये स्थान मिळणे आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट असून ती सर्वांच्या कष्टाची पावतीच आहे. या रँकिंगसाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या डॉ.विरेंद्र भोजवानी व डॉ.राकेश सिद्धेश्वर यांचेही खूप अभिनंदन!

- प्रा.डॉ.मंगेश कराड,
कार्यकारी अध्यक्ष तथा कुलगुरू,
एमआटी एडीटी विद्यापीठ, पुणे.

# अपर्णा पणशीकर यांच्या सादरीकरणातून वझेबुवांच्या गायकीची अनुभूती

## अल्फा इव्हेंटस्तर्फे कै. पंडित रामकृष्णबुवा वझे यांच्या स्मृतिदिनानिमित्त स्वरांजली कार्यक्रम

**पुणे । दिव्य रिपोर्टर**

ग्वाल्हेर आणि आग्रा घराण्याचे ख्यातकीर्त गायक, संगीतकार कै. पंडित रामकृष्णबुवा वझे यांच्या पठडीतील गायकीची अनुभूती आज रसिकांना आली. निमित्त होते कै. वझेबुवा यांच्या पुण्यतिथीदिनी अल्फा इव्हेटस्तर्फे आयोजित स्वरांजली या सांगीतिक कार्यक्रमाचे!

कोथरूडमधील शाकुंतल कलामंदिरात रविवारी (दि. ५) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वझेबुवा यांचे शिष्य पंडित भास्करबुवा जोशी यांच्याकडून गायनाची तालीम घेतलेल्या प्रसिद्ध गायिका अपर्णा पणशीकर यांचे गायन झाले तर डॉ. चैतन्य कुंटे यांनी वझेबुवांच्या गायन शैलीविषयी विस्तृत विवेचन करीत त्यांचा सांगीतिक प्रवास उलगडला.

ग्वाल्हेर, जयपूर घराण्याची गायकी आत्मसात केलेल्या अपर्णा पणशीकर यांनी मैफलीची सुरुवात अल्हैय्या बिलावल रागातल 'दैया कहा' या बड्या ख्यालने केली. त्यालाच पुढे 'आनंदकारी' या छोट्या ख्यालची जोड देत रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर खट रागातील 'तू है धर्मराज' हा बडा ख्याल सादर करून 'हर दम मौला तेरे' हा छोटा ख्याल प्रभावीपणे ऐकविला. अपर्णा पणशीकर यांना लीलाधर चक्रदेव (संवादिनी), प्रणव गुरव (तबला), माधवी घुमटकर, शुभांगी दंताळे (तानपुरा, सहगायन) यांनी समर्पक साथ केली.




कार्यक्रमाच्या उत्तरार्धात डॉ. चैतन्य कुंटे यांनी वझेबुवांच्या गायन शैलीविषयी विवेचन करताना वझेबुवांच्या गायनातील वैशिष्ट्ये, त्यांची कलाकार म्हणून घडलेली कारकीर्द, त्यांच्या गायनातील वेगळेपण, शिष्यांना ज्ञान द्यायची त्यांची तळमळ या विषयी रसिकांना अवगत केले. वझेबुवांकडे राग खोलण्याची तरकीब होती असे सांगून कुंटे म्हणाले, शंभर वर्षांपूर्वी भारतीय शास्त्रीय गायनातील खयाल गायकी निबद्ध होती, चौकटीत बांधलेली नव्हती त्यामुळे त्यांच्या शिष्यांमध्ये वझेबुवा ठळकपणे जाणवतात पण ते तुकड्यातुकड्याने. डॉ. कुंटे यांनी वझेबुवांनी गायलेला राग बहार वैभव, गारा बागेश्री आणि ठुमरीची झलक श्राव्य माध्यमातून ऐकवली. वझेबुवा गायनाची मैफल रंगविताना त्यात उत्स्फूर्तपणे विविध रंगछटांचे दर्शन घडवित असत त्यामुळे त्यांची एकाच रागातील दुसरी मैफल कधीच एकसारखी नसे. त्यांच्या गायकीत तीव्रीकरणाचे तत्त्व प्रकर्षाने जाणवत असे. तसेच त्यात नाट्यशास्त्रीय तत्त्वही दिसे ज्यामुळे मैफल अधिकाधीक उत्कंठावर्धक होत असे. ज्या काळात मोठ मोठे गवई आपले गाणे चोरून ठेवत त्या काळात वझेबुवांनी आपली विद्या उदारपणाने वाटली. यामुळेच त्यांचे गाणे त्यांच्या शिष्यांच्या माध्यमातून प्रवाहित होत राहिले. ते पुढे म्हणाले, बुवांचे मैफलीतील गाणे आणि शिकविण्यातील गाणे वेगवेगळे असे. 'स्व' बाजूला ठेवून गाणे शिकवावे लागते या विचारांमुळेच वझेबुवांनी गायन क्षेत्रात छाप निर्माण केले नाहीत. कार्यक्रमाची सांगता वझेबुवांच्याच आवाजातील राग भैरव भटियार ऐकवून करण्यात आली. कलाकारांचा सत्कार ज्येष्ठ शास्त्रीय गायिका मीरा पणशीकर, अंजली जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे निवेदन आरती पटवर्धन यांनी केले.